रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १०५ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)





# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १२ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹

तुझ्या कृपेने दिन उगवे हा,
करूनी तव भजना...
वंदितो तुजला गजवदना!
सिंदूर वदना तुजला नमितो,
तू आमुची प्रेरणा...
वंदितो तुजला गजवदना!




# जलजीवन मिशनला भ्रष्टाचाराचे ग्रहण?



- कामे निकृष्ट दर्जाची, नागरिकांचे पाण्यासाठी हाल
- प्रशासनाचा अंकुश नसल्याने योजनेचे वाटोळे

**| रायगड | खास प्रतिनिधी |**

जिल्ह्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी जलजीवन मिशन अंतर्गत १ हजार ४९६ योजना आखण्यात आल्या आहेत. यापैकी अवघ्या ३७१ योजना पूर्ण करण्यात आल्या आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांची पाण्यासाठीची भटकंती थांबावी, यासाठी योजना आखली आहे. मात्र, प्रशासनाचा ठेकेदारावर अंकुश नसल्याने जलजीवन योजनेचे वाटोळे होण्याची भीती विविध स्तरातून व्यक्त केली जात आहे. अशातच निकृष्ट दर्जाची कामे, होणारी दिरंगाई, निधीचा गैरवापर यामुळे या योजनेला भ्रष्टाचाराचे ग्रहण लागल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे.

अलिबाग तालुक्यातील ताडवागळेमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत एक कोटी ९२ लाख रुपयांची योजना मंजूर करण्यात आली असून, या योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे आहे. त्यामुळे पाण्यासाठीयेथीलनागरिकांनाचारकिलोमीटरचा प्रवास करावा लागत असल्याचे ताडवागळे गावाचे माजी सरपंच विद्याधर पाटील यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील नागरिकांना निर्धारीत वेळेत पिण्याचे पाणी देण्यास जिल्हा परिषद प्रशासन असमर्थ ठरत असेल, तर अशा योजना केवळ ठेकदारांना पोसण्यासाठीच आहेत का, असा प्रश्नही सर्वसामान्यांनी उपस्थित पान २ वर

> अलिबाग तालुक्यातील ताडवागळेमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत एक कोटी ९२ लाख रुपयांची योजना मंजूर करण्यात आली. योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे आहे. पाण्यासाठी येथील नागरिकांना चार किलोमीटरचा प्रवास करावा लागत आहे.
>
> – विद्याधर पाटील, माजी उपसरपंच

० ते २५ टक्के काम झालेल्या योजनांची संख्या ४० आहे. २५ ते ५० टक्के- १८४ योजना, ५० ते ७५ टक्के- ४११ आणि ७५ ते ९५ टक्के- २५३ योजनांचा संख्या आहे. ४० टक्के योजनांसाठी निधीच शिल्लक नसल्याने कामे रखडली आहेत.

> कोणतेही बिल अदा करण्याआधी झालेल्या कामांचे जीओ टॅगिंग केले जाते. त्यानंतर संबंधित ठेकेदाराला रक्कम दिली जाते. योजनांमध्ये नवीन कामे करतानाच जुन्या कामांची दुरुस्ती करणे, अशीदेखील कामे समाविष्ट केली आहेत. त्यामुळे नागरिकांचा गैरसमज होऊ शकतो. किती टक्के कामे झाली आहेत, याचा पूर्वी दररोज अहवाल केंद्र शासनाला पाठवण्यात येत होता. आता तसं काहीही होत नाही. सरकारकडून पुरेशा प्रमाणात निधी वितरीत होत नसल्याने अडचणी येत आहेत.
>
> – संजय वेंगुर्लेकर, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

# बाप्पासह गौराईला आज निरोप



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

पाच दिवसांच्या पाहुणचारानंतर गणरायासह गौराईला जड अंतःकरणाने गुरुवारी (दि. १२) भावपूर्ण निरोप देण्यात येणार आहे. सायंकाळी पाच वाजल्यापासून विसर्जन मिरवणुकांना प्रारंभ होणार आहे. 'गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या...' असा जयघोष करीत जिल्ह्यातील तलाव, नदी, समुद्रात तसेच कृत्रिम तलावांमध्ये ६० हजार ८५५ मूर्तींचे विसर्जन केले जाणार आहे. मिरवणूक व विसर्जनाच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी रायगड पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवला जाणार आहे.

दीड दिवसांच्या बाप्पानंतर पाच दिवसांच्या बाप्पाचे गौराईसोबत विसर्जन गुरुवारी केले जाणार आहे. ग्रामीण भागासह शहरी भागात सायंकाळी साडेपाच ते सहा वाजण्याच्या सुमारास मिरवणूक निघणार आहे. गुलालाची उधळण करीत, भजन, गाणी गात तसेच डिजेच्या तालावर नाचत बाप्पाला निरोप दिला जाणार आहे. त्याची तयारी जोरात सुरु आहे. मिरवणुकीवर पावसाचे विरजण पडू नये यासाठीदेखील अनेकांनी तयार केली आहे.

जिल्ह्यात पाच दिवसांच्या ५५ हजार ९२३ गणेशमूर्ती असून, ५४ हजार ९२३ खासगी व ७९ सार्वजनिक गणेशमूर्तींचा समावेश आहे. तसेच १५ हजार पान २ वर




# प्रसूतीसाठी हातगाडीवरुन गाठले रुग्णालय

- दुचाकीला हातगाडी बांधून जीवघेणा प्रवास
- आरोग्य यंत्रणेचा भोंगळ कारभार

**| पनवेल | वार्ताहर |**

विकासाच्या किती बाता मारल्या तरी समाजात घडणाऱ्या काही घटनांवरून आपण अजूनही किती विकासाच्या दृष्टीने मागे आहोत याचा प्रत्यय देणारी घटना पनवेलमध्ये घडली. आसूडगाव येथील एका गरोदर महिलेला चक्क हातगाडीवरुन रुग्णालयात नेण्याची वेळ तिच्या पतीवर आली. रात्रीची वेळ असल्याने ना रिक्षा, टॅक्सी उपलब्ध झाली, ना प्रशासन मदतीला धावून आले. १०८ रुग्णवाहिकेला संपर्क केला, पण प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी प्रसूती वेदना असह्य झालेल्या त्या महिलेला हातगाडीवरुन रुग्णालयात नेण्यात आले. तिची प्रसूती झाली असून,



बाळ आणि ती सुखरुप आहेत.

पनवेल महापालिका हद्दीत आसूडगाव येथे डोंबाऱ्याचा खेळ करून आपला उदरनिर्वाह करणाऱ्या एका कुटुंबातील महिलेला मध्यरात्री प्रसूती वेदना जाणवू लागल्या. मात्र, रुग्णालयात जाण्यासाठी कोणतेही खासगी वाहन मिळत नव्हते. आशा सेविकेला याबाबत माहिती दिली. तिने रुग्णवाहिकेचा नंबर दिला. तो लावला तरी समोरुन कोणी प्रतिसाद दिला नाही. शेवटी हतबल झालेल्या पतीने चक्क मोटारसायकलला हातगाडी जोडली आणि तीन किलोमीटरवर असलेले नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय असा पान २ वर

# नेरळमध्ये मारहाणीचा व्हिडीओ व्हायरल

## आ. थोरवेंचा बॉडीगार्ड असल्याचा ठाकरे गटाचा कांगावा

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ गावातील पाडा भागातील राजबाग सोसायटीच्या गेटवर कारमधील एकाला लाकडी दांडक्याने मारहाण करण्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आमदार महेंद्र थोरवे यांचा बॉडीगार्ड रस्त्यात मारहाण करीत असल्याचा आरोप वृत्तवाहिनीवर केला. त्यानंतर आमदार महेंद्र थोरवे यांनी तो तरुण माझा शिवसैनिक



असून, तो माझा बॉडीगार्ड नाही, असा खुलासा केला आहे.

वैयक्तिक वादामधून पिंपलोळी गावातील शिवाजी पान २ वर

# आमदार अपात्रता सुनावणी आज?

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

मंगळवारी रद्द करण्यात आलेली शिवसेना, राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी गुरुवारी (दि. १२) होणार असल्याचे निश्चित झाले आहे. ही सुनावणी १८ सप्टेंबरला घेऊ, असे संकेत मंगळवारच्या सुनावणीच्या वेळी सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. मात्र, आता न्यायालयाच्या गुरुवारच्या कामकाजाच्या यादीमध्ये या दोन्ही प्रकरणांचा समावेश असल्याने ही सुनावणी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या सुनावणीदरम्यान नेमकं काय होईल, याकडे सगळ्यांचे लक्ष लागलेले आहे.

शिवसेना आमदार अपात्र प्रकरणाची सुनावणी न्यायालयात सुरू आहे. एकीकडे राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहायला लागले आहेत. तर, दुसरीकडे या सुनावणीला गेल्या काही दिवसांपासून सातत्याने लांबणीवर टाकण्यात येत आहे. याआधी ही पान २ वर

G. M. VEDAK INSTITUTE OF TECHNOLOGY, TALA, RAIGAD

NAAC 'B' Accredited

(Approved By AICTE, Recognized by DTE, Govt. of Maharashtra and affiliated to University of Mumbai)

INSTITUTE CODE – 3447

ADMISSION NOTIFICATION FOR DIRECT SECOND YEAR ENGINEERING DEGREE COURSES FOR THE A. Y. 2024-25

AGAINST CAP VACANCIES FOR

FULL TIME ENGINEERING DEGREE COURSES

| Branch | Civil Engineering | Mechanical Engineering | Computer Engineering |
|---|---|---|---|
| Vacant Seats | 14 | 14 | 14 |

- Applications are invited for FE BE:

| Last Date of Application | Display of Merit List | Last Date of Admission |
|---|---|---|
| 12/09/2024 | 13/09/2024 | 14/09/2024 |

- **Eligibility:** As per the notification of DTE MS Information book, 2024.
- Prospectus and Admission Form will be available at **Rs. 1500 /-** in college office.
- For detailed information read the Notice Board & please **contact us: 9970534100**
- Cut of Date for all type of admission of Academic year 2024-25 will be **14/09/2024.**

Dr. D. N. Jaiswal
Principal

G. M. VEDAK INSTITUTE OF TECHNOLOGY, TALA, RAIGAD

NAAC 'B' Accredited

(Approved By AICTE, Recognized by DTE, Govt. of Maharashtra and affiliated to University of Mumbai)

INSTITUTE CODE – 3447

ADMISSION NOTIFICATION FOR FIRST YEAR ENGINEERING DEGREE COURSES FOR THE ACADEMIC YEAR 2024-25

AGAINST CAP VACANCIES FOR

FULL TIME ENGINEERING DEGREE COURSES

| Branch | Civil Engineering | Mechanical Engineering | Computer Engineering |
|---|---|---|---|
| Vacant Seats | 23 | 28 | 27 |

- Applications are invited for FE BE:

| Last Date of Application | Display of Merit List | Last Date of admission |
|---|---|---|
| 12/09/2024 | 13/09/2024 | 13/09/2024 |

- **Eligibility:** As per the notification of **DTE MS Information book, 2024.**
- Prospectus and Admission Form will be available at **Rs. 1500 /-** in college office.
- For detailed information read the Notice Board & please **contact us: 9970534100**
- Cut of Date for all type of admission of Academic year 2024-25 will be **13/09/2024.**

Dr. D. N. Jaiswal
Principal

# वेस्टर्न कमोडच्या नावाखाली रक्तचंदनाची तस्करी

### जेएनपीए बंदरातून दहा कोटींचे घबाड जप्त

### न्हावा-शेवा सीमा शुल्क विभागाची कारवाई



। चिरनेर । प्रतिनिधी ।

वेस्टर्न कमोडच्या बनावट नावाखाली जेएनपीए बंदरातून शारजात पाठविण्याच्या तयारीत असलेल्या एका कंटेनरमधून दहा कोटी किमतीचा ९.६ टन रक्तचंदनाचा साठा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी न्हावा-शेवा सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी दोन इसमांना अटक केली आहे.

जेएनपीएच्या सेझमधील सुरेश्वर सीएफएसमध्ये वेस्टर्न कमोड नावाने एक ट्रक कंटेनर मालाची निर्यात करण्यासाठी आला होता. या कंटेनरमधील माल शारजा येथील एका कंपनीत पाठविण्यात येणार होता. निर्यातीसाठी आलेल्या कंटेनरमधील मालाची न्हावा-शेवा सीमा शुल्क विभागाच्या एसआयआयबीच्या अधिकाऱ्यांनी कसून तपासणी केली होती. त्यानंतर सीमा शुल्क विभागाने तपासणी करून निर्यातीसाठी परवानगी दिलेला कंटेनर जेएनपीए अंतर्गत असलेल्या भारत मुंबई कंटेनर टर्मिनल (बीएमसीटी) बंदराकडे रवाना झाला. मात्र, अर्ध्या तासाच्या वाहतुकीदरम्यान सीमा शुल्क विभागाने तपासणी करून परवानगी दिलेला वेस्टर्न कमोड मालाचा सीलबंद कंटेनरची संघटित आंतरराष्ट्रीय माफियांच्या टोळीने आश्चर्यकारकरित्या अदलाबदली केली.

वेस्टर्न कमोड मालाच्या कंटेनरच्या जागी त्याच क्रमाकांचा ट्रक, वजन, वर्णन असलेला कंटेनर ज्यामध्ये ९.६ टन रक्तचंदन साठा ठेवण्यात आला होता. मोठ्या चतुराईने तस्करी मार्गाने या दहा कोटींचे रक्तचंदन शारजात पाठविण्याच्या तयारीत असलेल्या मालाची बित्तंबातमी न्हावा-शेवा सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली. खबऱ्याकडून माहिती मिळताच वेळ न दवडता शिताफीने न्हावा-शेवा सीमा शुल्क विभागाच्या एसआयआयबीच्या अधिकाऱ्यांनी जहाजांवर चढविण्याच्या तयारीत असलेल्या कंटेनरची कसून तपासणी केली होती. या तपासणीनंतर मालाची आंतरराष्ट्रीय माफियांच्या टोळीने शिताफीने अदलाबदली केलेल्या रक्तचंदनाच्या मालाचे प्रकरण उघडकीस आले.

याप्रकरणी न्हावा-शेवा सीमा शुल्क विभागाच्या एसआयआयबीच्या अधिकाऱ्यांनी ट्रान्सपोर्ट कंपनीचा मालक अक्षय भाऊसाहेब आणि ट्रक-कंटेनर चालक गणेश सुखधरे या इसमांना अटक केली आहे. तर निर्यातदार, मालक फरार झाले आहेत. न्यायालयाने दोन्ही संशयित आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. आंतरराष्ट्रीय माफियांच्या टोळीचा हायप्रोफाइल तस्करीचा प्रयत्न सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी मोठ्या चतुराईने हाणून पाडला. याप्रकरणी सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांकडून अधिक तपास केला जात आहे.

# जिल्हा प्रशासन लागले निवडणुकीच्या कामाला

### जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली नोडल अधिकाऱ्यांची बैठक



। रायगड । खास प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली असतानाच आता जिल्हा प्रशासनदेखील तयारीला लागले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी नोडल अधिकाऱ्यांची बुधवारी (दि. ११) बैठक घेतली. याप्रसंगी त्यांनी संबंधितांना विविध सूचना केल्या.

या बैठकीस अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे यांसह २३ समित्यांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, आगामी विधानसभा निवडणूक २०२४ च्या निवडणूक कालावधीमध्ये कामकाज करण्यासाठी जिल्हा स्तरावर नोडल अधिकारी व सहायक नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. यामध्ये मुख्य नियंत्रण कक्ष, वाहतूक व्यवस्थापन, आदर्श आचार संहिता, बॅलेट पेपर आणि पोस्टल बॅलेट पेपर व्यवस्थापन, कायदा व सुव्यवस्था, प्रसार माध्यम आणि संदेशवहन, निवडणूक निरीक्षक, प्रशिक्षण आणि जनजागृती, मतदान केंद्र, मतदान केंद्रावरील किमान मूलभूत सुविधा, दिव्यांग मतदार, स्वीप मोहीम शहरी व ग्रामीण भाग या निवडणूकविषयक कामकाजासाठी नोडल अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत.

मतदान कर्मचाऱ्यांना ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीचे जास्तीत जास्त प्रशिक्षण देण्याबाबत निर्देश त्यांनी दिले. निवडणूक प्रक्रियेदरम्यान आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्याची खात्री करा, शांततापूर्ण निवडणुकांसाठी सुरक्षा योजना तयार करा, पोस्टल मतदानासाठी पात्र व्यक्तींना पोस्टल मतदानाबाबतची माहिती मुदतीत देण्यात यावी, कोणत्या मतदारांना टपाल मतपत्रिकेची सुविधा उपलब्ध करून द्यायची आहे हेदेखील बीएलओला माहीत असावे, सोशल मीडियावर विशेष नजर ठेवावी, असे निर्देश त्यांनी दिले.

**जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश**

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करावी. निवडणुकीवर प्रभाव टाकणारी सामुग्री रोखण्यासाठी जिल्हा आणि राज्याच्या सीमेवर चौक्या उभारण्यात याव्यात, फ्लाइंग स्क्वॉड आणि एसएसटीसाठी मनुष्यबळ उपलब्ध करून घ्यावे, निवडणूक संबंधित तक्रारींसाठी तयार करण्यात आलेल्या सी-व्हिजिल मोबाईल ॲपवर लक्ष ठेवावे, तात्काळ निराकरण करावे, मतदार जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबवावी, आदिवासी वाड्या-वस्त्या या ठिकाणी तसेच मतदानाची टक्केवारी कमी असलेल्या भागाकडे विशेष लक्ष द्यावे, असेही निर्देश जावळे यांनी यावेळी दिले.

**प्रात्यक्षिक केंद्राचे उद्‌घाटन**

विधानसभा निवडणूक २०२४ करिता ईव्हीएम व व्हीव्हीपॅटची जनजागृती करण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय रायगड येथे जावळे यांच्या हस्ते प्रात्यक्षिक केंद्राचे उद्‌घाटन करण्यात आले.

# दूषित पाण्याचा सॉसनिर्मितीसाठी वापर

### कंपनीविरोधात गुन्हा दाखल

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

कंपनी बंद करण्याचे आदेश असतानाही छुप्या पद्धतीने काम सुरु ठेवणाऱ्या एका न्यूडल्स कंपनीच्या मालकाविरोधात अन्न आणि औषध प्रशासनाकडून कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कामोठे, सेक्टर-१९ मधील कुमार फुड प्रॉडक्ट्स कंपनीमधून मिरची सॉस, टोमॅटो सॉस, ॲपल सॉस, केचप (सॉस) यासारखे अन्न पदार्थ तयार केले जात होते. मात्र, त्यासाठी या कंपनीकडून खराब पदार्थांचा आणि दूषित पाण्याचा वापर करण्यात येत असल्याचे 'मनसे'च्या पदाधिकाऱ्यांना आढळून आल्यानंतर त्यांनी याबाबत अन्नऔषध प्रशासन विभागाकडे तक्रार केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने अन्न-औषध प्रशासन विभागाने जुलै महिन्यामध्ये कुमार फुड प्रॉडक्ट्सच्या कामोठे, सेक्टर१९ मधील कंपनीची तपासणी केली होती. या तपासणीत अन्न सुरक्षा मानदे कायद्यामधील विविध तरतुदींचे उल्लंघन केल्याचे आढळून आले होते.

त्यामुळे अन्न-औषध प्रशासन विभागाने सदर त्रुटींची पूर्तता करेपर्यंत अन्न व्यवसाय बंद करण्याचे आदेश कंपनीचे मालक राकुमार राऊत यांना दिले होते. त्यानुसार राऊत यांनी काही दिवस आपला व्यवसाय बंद केला. मात्र, ऑगस्ट महिन्यामध्ये त्यांनी रात्रीच्या अंधरात लपूनछपून आपल्या अन्न व्यवसायाला सुरुवात केली होती. याबाबतची तक्रार अन्न औषध प्रशासन विभागाकडे गेल्यानंतर अधिकाऱ्यांनी गत आठवड्यात पुन्हा या कंपनीच्या गाळ्याला भेट देऊन पडताळणी केली. मात्र, यावेळी सदर गाळ्यामध्ये अन्न व्यवसाय सुरु नसल्याचे समोर आले. परंतु, एफडीएच्या अधिकाऱ्यांनी सदर कंपनीचे मालक राजकुमार राऊत यांची चौकशी करुन त्यांचा जबाब घेतला असता, राऊत यांनी कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी १५ ऑगस्टपासून पुन्हा तोच अन्न व्यवसाय त्याच ठिकाणी रात्रीच्या अंधारामध्ये लपूनछपून सुरु केल्याची कबुली दिली. राजकुमार राऊत यांनी अन्नऔषध प्रशासन विभागाने अन्न व्यवसाय बंद ठेवण्याच्या दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्याने राऊत यांच्याविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# आवरे येथे विद्यार्थ्यांचा गुणगौरव



। चिरनेर । प्रतिनिधी ।

आवरे येथील आरती समूहातर्फे दहावी, बारावी परीक्षेत प्रथम, द्वितीय, तृतीय अशा गुणानुक्रमे येणाऱ्या विद्यार्थ्यांचा सात सप्टेंबर रोजी गणेश चतुर्थी प्रतिष्ठान सोहळ्याप्रसंगी त्यांच्या घरी जाऊन सन्मानचिन्ह देऊन गुणगौरव केला. विद्यार्थ्यांनी आई-वडिलांचे आशीर्वाद घेतले.

दरम्यान, शंकर पाटील, सुभाष म्हात्रे, निलेश गावंड, निवास गावंड तसेच आर्थिक समूहाचे अन्य सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

# माकडांच्या शरीरावर ट्यूमरच्या गाठी

### उपचाराबाबत सरकारी विभागाकडून टोलवाटोलवी

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरानचे जंगलात शरीरावर गाठी असलेली माकडे आढळून आली आहेत. त्याबद्दल प्राणीमित्र राकेश कोकळे यांनी समाज माध्यमांवर माहिती दिल्यानंतर वन विभाग आणि पशुसंवर्धन विभाग जागा झाला आहे. पशुसंवर्धन विभाग माकडांच्या अंगावरील गाठ ही शरीरातील वाढीची गाठ असल्याचा निष्कर्ष काढला आहे. दरम्यान, बदलापूर येथील प्राणीमित्र यांनी ती गाठ कॅन्सरची असल्याचे म्हटले असून, त्यावर तात्काळ उपचार करायला हवेत, अशी सूचना केली आहे.

माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी दहा हजारांहून अधिक माकडे तसेच काही वानर यांचा अधिवास आहे. त्यातील काही माकडांच्या शरीरावर गाठ दिसून येत असून, त्या गाठी मूळ शरीराच्या बाहेर पडलेल्या आहेत. त्या गाठींना सोबत घेऊनच ती माकडे माथेरानच्या जंगलात फिरत आहेत. साधारण आठ ते दहा माकडे अशा स्थितीत असून, माथेरान नगरपरिषद कार्यालयाच्या मीटिंग हॉलजवळ



एक माकड प्राणीमित्र राकेश कोकळे यांच्या दृष्टीस पडले. त्यानंतर त्या माकडाचे व्हिडिओ आणि फोटो समाज माध्यमांवर शेअर केले. त्यानंतर वन विभाग आणि पशुसंवर्धन विभाग जागा झाला. त्या माकडाचे फोटो बघून पशुसंवर्धन तालुका पशुधन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव माथेरान येथे पोहोचले. त्यांनी त्या फोटोमधील माकड बघून त्या माकडांना असलेली गाठ ही त्यांच्या शरीराच्या वाढीमधील गाठ असल्याचे नमूद केले आहे. त्यात प्रथमदर्शनी एका माकडापासून दुसऱ्या माकडाला काही त्रास होण्याची शक्यता नाही, असा दावा पशुसंवर्धन विभागाने केला आहे. त्याचवेळी वन्यप्राण्यांमध्ये असा काही त्रास, व्याधी आणि आजारपण आढळल्यास त्या प्राण्याला वनविभाग यांच्याकडून वन्यप्राणी आवश्यक तपासणी तसेच औषधोपचाराकरिता नजीकच्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्यास दाखल करू शकतात, असा सल्ला दिला आहे.

मात्र, वन विभागाने जंगलात फिरणाऱ्या त्या माकडाला अद्याप पकडले नाही. त्यामुळे वन विभाग जोवर अशा गाठ असलेल्या जखमी माकडांना पकडून पशुसंवर्धन विभाग यांच्या ताब्यात देत नाही, तोवर त्या माकडांवर कोणतेही प्रकारचे उपचार करता येणार नाहीत. दुसरीकडे वन विभागाने असे माकड पकडण्यासाठी आपले वन रक्षकांना जंगलात पाठवले असून, ती शरीराची गाठ बाहेर आलेली माकडे वन कर्मचारी यांच्या हाती लागली नाहीत, अशी माहिती वनपाल आढे यांनी दिली. तर वन्यप्राणीप्रेमी असलेले बदलापूर येथील प्रदीप मेहेर यांनी त्या माकडांना ट्यूमर प्रकारचा आजार झाला असल्याची माहिती दिली आहे.

### जसखारमध्ये मलेरिया तापाचे रुग्ण

**उरण :** तालुक्यातील गर्भश्रीमंत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जसखार गावात मलेरिया तापाचे रुग्ण आढळून येत असल्याने रहिवासी भीतीच्या सावटाखाली वावरत आहेत. त्यामुळे आरोग्य विभाग ॲक्शन मोडवर आले आहे. जेएनपीए बंदर व इतर प्रकल्पांचा सर्वाधिक मालमत्ता कर हा उरण तालुक्यातील जसखार ग्रामपंचायतीला मिळत असल्याने तालुक्यातील सर्वाधिक मालमत्ता कर मिळणारी गर्भश्रीमंत ग्रामपंचायत म्हणून जसखार ग्रामपंचायतीकडे पाहिले जाते. मात्र, ग्रामपंचायतीच्या भ्रष्ट कारभारामुळे या ग्रामपंचायत हद्दीतील रहिवाशांना अनेक समस्यांनी वेढले आहे. त्यात या ग्रामपंचायत हद्दीत सध्या डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने तसेच वातावरणातील बदलामुळे सर्दी, खोकला, अंगदुखी, ताप, मलेरियासारख्या आजारांनी त्रस्त झालेले रुग्ण आढळून येत आहेत. तरी नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन सुनीलराज साईनादंइ, सुपरवाझर तालुका आरोग्य विभाग कोप्रोली-उरण यांनी केले आहे.

# कामोठे वसाहतीमध्ये वृक्षारोपण

**पनवेल :** जिल्हा परिषद शाळा कामोठे येथे वृक्षारोपण करण्यात आले. दरम्यान, ५० झाडे लावण्यात आली. त्यात मुख्य करून आंबा, पिंपळ, चिंच, अशा विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. शेकाप कामोठे कार्याध्यक्ष गौरव भाई पोरवाल यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पाडण्यात आला.एक विद्यार्थी, एक झाड अशी संकल्पना करण्यात आली. वृक्षारोपणामुळे आपल्याला किती फायदे होतात, त्याचे महत्त्व भाई पोरवाल यांनी विद्यार्थ्यांना समजून सांगितले. या कार्यक्रमाला जयदास गोवारी, सूरदास गोवारी, कामोठे प्रमुख शहर संघटक अल्पेश माने, उपाध्यक्ष सचिन झणझणे, आवटी, अजय कदम, शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापक यांची उपस्थिती होती.

## पान १ वरुन

### बाप्पासह गौराईला आज निरोप

८५३ गौराईंची मूर्ती, मुखवटे आहेत. गुरुवारी सायंकाळी काढण्यात येणाऱ्या मिरवणुका मशीद, दर्गा, मोहल्ला अशा एकूण १६ ठिकाणांहून जाणार आहेत. जिल्हा पोलीस दलामार्फत राज्य राखीव पोलीस दल, आरसीपी प्लाटून दल तैनात करण्यात येणार आहेत. जिल्ह्यात स्ट्रायकींग फोर्स असणार आहेत. त्यामध्ये ५० पोलीस अंमलदारांची नेमणूक केली आहे. जिल्ह्यातील पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांबरोबरच पाचशे होमगार्डदेखील पोलिसांच्या मदतीला असणार आहेत. गणेशोत्सव आनंदात साजरा करता यावा, गैरप्रकार रोखण्यासाठी राज्य राखीव पोलीस दलाला पाचारण करण्यात आले असून, हे दल जिल्ह्यात दाखल झाले आहे.

**समुद्रकिनारी विविध सोयी सुविधा**

इको फ्रेंडली गणपती उत्सवाच्या निमित्ताने कृत्रिम तलाव समुद्रकिनारी उभारण्यात आला आहे. दीड दिवसांच्या २५ हून अधिक गणेशमूर्तींचे तलावात विसर्जन केले. पाच दिवसांच्या गणेशमूर्तींचे विसर्जन गुरुवारी होणार आहे. समुद्रकिनाऱ्यांपासून शंभर मीटर अंतरापर्यंत विद्युत सेवेची व्यवस्था केली आहे. कर्मचाऱ्यांसाठी बैठक व्यवस्था, स्वागत कक्ष, मदत कक्ष, आरती कक्ष, वारंवार सूचना देणारे कक्ष, निर्माल्य संकलन केंद्र, अशा अनेक सोयी सुविधा केल्या असल्याची माहिती अलिबाग नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांनी दिली.

### जलजीवन मिशनला भ्रष्टाचाराचे ग्रहण?

केला आहे. दीड हजार कोटी रुपये जिल्ह्यातील एक हजार ४९६ जलजीवन योजनांसाठी केंद्र शासनाकडून खर्च केले जाणार आहेत. प्रत्यक्षपणे जलजीवनची कामे वाटप करताना कमालीची गुप्तता पाळण्यात आली होती. एका-एका कंत्राटदाराच्या घशात ५० कोटींहून अधिक कामांचे वाटप झाले होते. तर, काहींना क्षमतेपेक्षा जास्त कामे दिली होती. ही सर्व कामे २०२४ पर्यंत पूर्ण करण्याची अटही करारनाम्यामध्ये घालण्यात आली होती. कामे वाटपाच्या प्राथमिक टप्प्यातच ही योजना वादाच्या भोवऱ्यात अडकली होती. जलस्त्रोतांची योग्य न निवड केल्याने ग्रामस्थांकडूनही कंत्राटदार आणि ग्रामस्थांमध्ये वाद उफाळून आले होते. स्थानिकांना विचारत न घेताच काही ठेकेदार मनमानी करत असल्याच्या तक्रारींचा पाढा पालकमंत्री उदय सामंत यांच्यापुढे वाचण्यात आला होता. त्यानूसार त्यांनी सूचनाही दिल्या मात्र ये रे माझ्या मागल्या... अशीच गत झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

लोकसभा निवडणुकांपूर्वी दर आठवड्याला जलजीवन योजनेच्या कामांचा आढावा घेतला जात असे. पाणीपुरवठा अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी तालुक्यांमध्ये फिरून कामे पूर्ण कशी होतील, यासाठी प्रयत्न करीत होते. मात्र निवडणूक होताच हे सर्व थांबल्याचे समोर आले आहे. मार्च महिन्यात सरकारकडे १५० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात ४० कोटी रुपयेच देण्यात आले आहेत. त्यामुळे सरकारकडून निधीच वितरीत होत नसल्याने योजना लटकण्याच्या स्थितीत आली आहे.

### प्रसूतीसाठी हातगाडीवरुन गाठले रुग्णालय

जीवघेणा प्रवास केला. तेथील डॉक्टरांनी तात्काळ उपचार सुरु केल्याने या महिलेने गोंडस मुलाला जन्म दिला. पनवेलसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी ही घटना घडल्याने राज्यासह स्थानिक आरोग्यसेवेचे पितळ उघडे पडले असून, नागरिकांकडून याबाबत तीव्र स्वरूपाची नाराजी व्यक्त केली जात आहे.

### नेरळमध्ये मारहाणीचा व्हिडीओ व्हायरल

सोनावले उर्फ शिवा हा तरुण कारमधील एकाला मारहाण करीत असल्याचा व्हिडिओ बुधवारी (दि. ११) व्हायरल झाला. हा व्हिडिओ एका वृत्तवाहिनीने घेऊन त्यावर विधान परिषदेचे विरोधी पक्षाचे नेते अंबादास दानवे यांची बाइट घेत कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांचे बॉडीगार्ड भर रस्त्यात मारहाण करीत असल्याचा आरोप केला. सदर घटना नेरळ गावातील पाडा भागातील राजबाग सोसायटीच्या गेटवर झाली असून, अमोल बांदल या तरुणाला संबंधित पिंपलोळी गावातील शिवाजी सोनावले उर्फ शिवा हा तरुण मारहाण करीत असल्याचे दिसून येत आहे. ही घटना शनिवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास घडली असून, अमोल बांदल हे आपल्या वाहनातून नेरळ पाडा भागातून जात होते आणि त्यावेळी शिवा सोनावळे या तरुणाने ही मारहाण केली. त्यावेळी रस्त्याने अनेक दुचाकीस्वार आणि चारचाकी वाहनांची ये-जा सुरू होती. मारहाण केल्यानंतर शिवा सोनावळे तेथून चालत पाडा रेल्वे फाटक येथून पूर्व भागात गेल्याचे काही प्रत्यक्षदर्शी सांगत आहेत.

या मारहाण घटनेची कोणतीही नोंद अमोल बांदल यांनी नेरळ पोलीस ठाणे येथे केलेली नाही. मात्र, घटना घडल्यानंतर चार दिवसांनी त्या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला आणि घटना समोर आली आहे. या घटनेबद्दल आमदार महेंद्र थोरवे यांनी आपली प्रतिक्रिया वाहिन्या आणि माध्यमांना दिली आहे. त्यात त्यांनी दोन्ही कार्यकर्ते माझे कार्यकर्ते असून, शिवसैनिक आहेत. बांदल हे माझे नातेवाईक असून, शिवा सोनावळे हादेखील जवळचा कार्यकर्ता आहे. शिवा सोनावळे कधीही माझा बॉडीगार्ड नव्हता. माझ्यासोबत सरकारी पोलीस हाच एकमेव बॉडीगार्ड असतो, असे देखील आमदार थोरवे यांनी स्पष्ट केले आहे. तर, ठाकरे गटाने हा व्हिडिओ मिळवून माझी बदनामी करण्याचा प्रयत्न केला असून, ठाकरे गटाचे ते दोघे कार्यकर्ते नसल्याने माझ्या बदनामीचे षड्यंत्र रचले जात असल्याचा आरोप विरोधकांवर केला.

दरम्यान, या घटनेची कोणतीही नोंद नेरळ पोलीस ठाण्यात नाही, अशी माहिती पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांनी दिली आहे.

### आमदार अपात्रता सुनावणी आज?

सुनावणी दोन आठवडे लांबणीवर टाकली होती. त्यानंतर मंगळवारीदेखील प्रकरण नंबर १ दिवसभर ऐकलं जाणार असल्याने आमदार अपात्रताप्रकरणी सुनावणी झाली नव्हती. त्यानंतर ही सुनावणी १८ सप्टेंबरला होईल, असं बोललं जात होतं. मात्र, आता ही सुनावणी गुरुवारी होणार असल्याचे समजत असल्याने राष्ट्रवादी आणि शिवसेनेचे याकडे लक्ष लागले आहे.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



। म्हसळा । वार्ताहर ।

गणेशोत्सवाचे औचित्य साधून दि. ८ सप्टेंबर रोजी राजिप शाळा चिखलप आदिवासी शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये वह्या, पेन, पेन्सिल, चित्रकला वही आदी साहित्याचा समावेश होता. ठाकरोली गावचे सुपुत्र महेंद्र जाधव यांच्या माध्यमातून नेहमी असे शालेय उपक्रम तालुक्याच्या ठिकाणी राबविण्यात येत असतात, असे ग्रामस्थांनी सांगितले.

दरम्यान, मनोगत व्यक्त करताना महेंद्र जाधव यांनी सांगितले की, या शाळेतील विद्यार्थ्यांनी तालुका ठिकाणी शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक करावे. जे सहकार्य लागेल, ते आपल्या माध्यमातून नक्कीच पूर्ण करू यात शंका नाही. आपले आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांसाठी नेहमी सहकार्य असेल, तसेच आपल्या शाळेत शिकून पुढील अभ्यास दहावी आणि बारावी करत असलेल्या विद्यार्थ्यांना करिअरसाठी काही अडचणी आल्यास नक्कीच सहकार्य करण्याचे जाधव यांनी मनोगतात सांगितले.

या कार्यक्रमाला महेंद्र जाधव, आदर्श शिक्षक बेटकर, स्वरा जाधव, शिक्षणप्रेमी नितेश जाधव, नरेंद्र विचारे, प्रल्हाद जाधव, शाळा समिती अध्यक्ष संतोष मुकणे, ग्रामपंचायत सदस्य मोहन पवार, पोलीस पाटील रवींद्र पवार, पालक नरेश पवार, रेष्मा पवार, मुक्ता वाघे, सविता जाधव, कलाशिक्षक दिलीप शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

# 'पीएनजी'कडून समभाग विक्रीसाठी योजना




। मुंबई । प्रतिनिधी ।

पी.एन. गाडगीळ ज्वेलर्स लिमिटेडने मंगळवारी (१०) आपली प्राथमिक समभाग विक्री खुली करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. बोली/ऑफर बंद होण्याची तारीख गुरुवार, १२ सप्टेंबर आहे. ऑफरसाठी प्रति इक्विटी शेअर्ससाठी ४५६ रु. ते ४८० रु चा किंमतपट्टा निश्चित करण्यात आला आहे. बोली किमान ३१ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ३१ इक्विटी शेअर्सच्या पटीत लावता येईल.

कंपनीच्या प्राथमिक समभाग विक्रीमध्ये १० रु. दर्शनी मूल्य असलेल्या इक्विटी शेअर्सचा फ्रेश इश्यू ८,५०० दशलक्ष रु.पर्यंत आहे आणि १० रु. दर्शनी मूल्य असलेल्या इक्विटी शेअर्सची विक्री २,५०० दशलक्ष रु.पर्यंत आहे. एकूण ऑफर साईजमध्ये ११,००० दशलक्ष रु.पर्यंतचे १० रु.चे दर्शनी मूल्य असलेले इक्विटी शेअर्स आहेत. विक्रीची ऑफरमध्ये बिझनेस ट्रस्ट (प्रवर्तक विक्री शेअरधारक) कडून २,५०० दशलक्ष रुपयांपर्यंत १० रुपयांचे दर्शनी मूल्य असलेले इक्विटी शेअर्स आहेत.

प्रमुख गुंतवणूकदारांखेरीज सर्व संभाव्य गुंतवणूकदारांनी आपापल्या खात्यांचा तपशील आणि यूपीआय अर्जदारांसाठी यूपीआय आयडीसह जाहीर करून अर्जाची विहित रक्कम ॲप्लीकेशन सपोर्टेड बाय ब्लॉक अमाऊंट प्रक्रियेद्वारे करून ठेवणे बंधनकारक आहे. त्यानुसार योजनेत सहभागी करून घेण्यासाठी सर्व बोली रकमा या सेल्फ सर्टिफाइड सिंडिकेट बँक्स एससीएसबीतर्फे किंवा यूपीआय यंत्रणेंतर्गत स्पॉन्सर बँकेतर्फे ब्लॉक करून ठेवण्यात येतील. प्रमुख गुंतवणूकदारांना त्यांच्यासाठीच्या हिश्श्यात प्रक्रियेनुसार सहभागी होण्याची परवानगी नाही.

रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसच्या अनुषंगाने सादर केलेले इक्विटी शेअर्स आणि वर सूचीबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे. कंपनीला ३ जुलै २०२४ रोजीच्या पत्राद्वारे सूचीबद्ध करण्यासाठी तत्त्वातः मान्यता प्राप्त झाली आहे.

मोतिलाल ओसवाल इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायझर्स लिमिटेड, नुवामा वेल्थ मॅनेजमेंट लिमिटेड (पूर्वी एडलबाईस सिक्युरिटीज लिमिटेड म्हणून ओळखली जात होती) आणि कॅपिटल मार्केट्स लिमिटेड हे ऑफरचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स आहेत.

# ‘राष्ट्र प्रथम’च्या बाता

काश्मीरमध्ये आपण शांतता आणली आहे असा मोदी सरकारचा दावा आहे. तो किती खरा आहे हे संशयास्पद आहे. तेथील पत्रकार, कार्यकर्ते यांची पुरती नाकेबंदी करण्यात आली आहे. विरोधात एकही शब्द बोलणे कठीण झाले आहे. निवडणुकांमध्ये जनता भाग घेणार आहे. पण हे सर्व प्रचंड लष्करी ताकदीच्या बळावर आणि इडी आणि सीबीआयच्या भीतीच्या आधारे केले जात आहे. असो. एकीकडे हा प्रश्न पुरता सुटलेला नसतानाच ईशान्येमध्ये मणिपूरच्या रुपाने नवीन अशांत प्रांत निर्माण झाला आहे. आणि, हे सर्वस्वी नरेंद्र मोदी यांच्या भाजपचे व सरकारचे ‘कर्तृत्व’ आहे. गेले जवळपास सोळा ते अठरा महिने मणिपूर जळत आहे. मात्र केंद्र सरकारला त्यात काही करावे असे वाटत नाही. कुकी, झो हे आदिवासी विरुध्द मैतेई असा हा संघर्ष आहे. भाजपचे मुख्यमंत्री असलेले बीरेनसिंग हे मैतेई समाजाचे आहेत. राज्यातील बहुतांश अधिकारी, पोलिस हे मैतेई असून आर्थिक व्यवहारही त्यांच्याच नियंत्रणात आहेत. या संघर्षात भाजप आणि त्यांचे मुख्यमंत्री हे सरळ सरळ मैतेईंची बाजू घेऊन संघर्षात उतरलेले दिसतात. असे असताना केंद्राने खरे तर बीरेनसिंग यांना काढून टाकायला हवे होते. पण विरोधकांच्या मागणीपुढे झुकलो असे दिसता कामा नये ही नरेंद्र मोदींची गुर्मी अजूनही कायम आहे. राज्यात शेकडो लोकांचे जीव गेले तरीही त्यांचा ताठा कायम आहे. हे राज्य जणू भारतात नसल्यासारखेच त्यांचे वर्तन आहे. गेल्या वर्षी या प्रश्नावरून विरोधकांनी संसदेत अविश्वास ठराव आणला होता. त्याला उत्तर देताना मोदींनी पहिला दीड तास मणिपूरमधला म देखील उच्चारला नाही. इतका बालिश आणि खुनशी पंतप्रधान देशाने यापूर्वी कधीही पाहिलेला नाही. लोकसभा निवडणुकीत दणका बसल्यानंतर तरी किमान यांना सुबुध्दी सुचेल असे वाटले होते. पण ती अपेक्षाही फोल ठरली आहे.

## राज्याची फाळणी

एक सप्टेंबरपासून राज्यात नव्याने हिंसाचार उसळला असून अकरा जण ठार झाले आहेत. गेल्या वर्षी कुकी या आदिवासी समाजाचे आरक्षण मैतेईंना देखील देण्याचा निर्णय इम्फाळ उच्च न्यायालयाने दिला. त्याला कुकी समाजाने विरोध केला. त्यावर सरकारने तात्काळ काही पावले उचलणे व त्यांचे आरक्षण कमी होणार नाही याबाबत त्यांना आश्वस्त करणे आवश्यक होते. पण प्रत्यक्षात बीरेन सिंग सरकारने मैतेईंची बाजू घेऊन कुकी समाजाचे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. एका महिलेची नग्न धिंड काढण्यात आली. पोलिस स्वस्थपणे पाहत बसले. यातून मग हिंसाचाराचा भडका उडाला. राज्य अक्षरशः कुकी आणि मैतेई अशा दोन गटात वाटले गेले. आता एका समाजाचा मनुष्य दुसऱ्या भागात जाऊ शकत नाही. फार काय, दुसऱ्या समाजाचा पोलिस अधिकारी किंवा लष्करी जवानही आपल्या इलाख्यात आलेला सहन केला जात नाही. यापूर्वी अशांच्या हत्या झाल्या आहेत. आता कुकींना स्वतःचा असा स्वतंत्र प्रदेश हवा आहे. त्यांना मैतेईंनी आपल्यावर राज्य केलेले मान्य नाही. या दोन्ही समाजांना एकत्र आणण्यासाठी वा त्यांच्यात संवाद घडवण्यासाठी केंद्र सरकारने प्रयत्न करणे आवश्यक होते. पण मोदी सरकार डोळ्यावर कातडे ओढून बसले आहे. बंगालमध्ये एका बलात्कार प्रकरणावरून वातावरण पेटवून राष्ट्रपती राजवट लावावी अशी मागणी भाजपवाले करतात. मात्र सरहद्दीवरचा प्रांत असलेल्या मणिपूरमध्ये भयंकर यादवी चालू असूनही तेथे हस्तक्षेप करावा असे मोदी किंवा अमित शाह यांना वाटत नाही. मोदी दुनियाभर सर्वत्र फिरतात. अनेक फालतू गोष्टींवर सोशल मिडियामधून ते संदेश प्रसारित करतात. पण त्यांना मणिपूरविषयी बोलावे असे वाटत नाही. सरसंघचालक मोहन भागवत यांनी किमान दोन-तीन वेळा मणिपूर शांत करण्याची गरज बोलून दाखवली आहे. पण त्यांचेही ऐकण्यास मोदी तयार नाहीत. राष्ट्र प्रथम वगैरे निव्वळ गप्पा आहेत. मोदींना आपल्या अहंकारापुढे देशाचीही पर्वा उरलेली नाही.

## राष्ट्रपती राजवटच हवी

गेल्या वर्षी दोन्ही बाजूंच्या हिंसक जमावांनी पोलिस व सुरक्षा दलांची शस्त्रे लुटली होती. त्यांचा भरपूर साठा दोन्हीकडे आहे. त्यातच गेल्या दहा दिवसात या हिंसाचारात ड्रोनचा प्रवेश झाला आहे. ड्रोनमार्फत बॉंबचे तसेच रॉकेटचे हल्ले करण्याचे प्रकार हे अत्यंत गंभीर आहेत. काश्मीरमध्ये याच रीतीने दूरवरून अतिरेकी मारगिरी करीत असत. हे असेच चालू राहिले तर चीनसारखे देश याचा फायदा उठवू शकतात व सीमेपलिकडून ड्रोनचे अधिकाधिक हल्ले करू शकतात. मंगळवारी राज्यातील शेकडो विद्यार्थ्यांनी राजभवनावर मोर्चा काढून पोलिस महासंचालकांना हटवण्याची मागणी केली. त्यांच्यावर पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्यात बरेच जण जखमी झाले. नंतर पाच जिल्ह्यांमध्ये इंटरनेट बंद करण्यात आले. हे सर्व मणिपूरचे काश्मीरीकरण होण्याच्या दिशेने चालले आहे. ते वेळीच रोखायला हवे. अन्यथा देशाला त्याची मोठी किंमत चुकवावी लागू शकते. विशेष म्हणजे केंद्र सरकार अपयशी ठरल्याचा अप्रत्यक्ष ठपका ठेवणाऱ्यांमध्ये खुद्द मुख्यमंत्र्यांचे जावई हेदेखील सहभागी झाले आहेत. आरके इमो सिंग असे त्यांचे नाव असून ते भाजपचे आमदारही आहेत.राज्यामध्ये तब्बल साठ हजार केंद्रीय सुरक्षा दलांचे जवान तैनात आहेत. ते हातावरहात ठेवून बसलेले असतात असा आरोप या इमो सिंग यांनी केला असून त्यांना राज्यातून काढून घ्यावे अशी मागणी त्यांनी केली आहे. अर्थात, हे इमो सिंग मैतेईंच्या बाजूचे असून त्यांचेही हेतू सरळ नाहीत. मात्र एकूण स्थिती अत्यंत निर्नायकी व यादवीसदृश झाली आहे यात शंका नाही. अमित शाह एरवी बरेच इशारे वगैरे देत असतात. त्यांचे सल्लागार अजित डोभाल यांना तर भारत सरकारचे जेम्स बॉन्ड वगैरे म्हणतात. पण या सर्वांची बोलती मणिपूरमध्ये बंद झाली आहे. मोदी, शाह आणि मंडळींची कारभारशून्यता देशाला भयंकर महागात पडणार आहे. राष्ट्र प्रथम ही घोषणा मणिपुरात खोटी ठरते आहे.

विचार

# ‘अॅक्ट ईस्ट’ धोरणाला धोका

***म्यानमारमध्ये सुरू असलेले भयंकर गृहयुद्ध आणि बांगलादेशमधील राजकीय गोंधळाच्या पार्श्वभूमीवर भारताचे ‘अॅक्ट ईस्ट’ धोरण धोक्यात आले आहे. ईशान्य भारत आणि आग्नेय आशियामधील आर्थिक आणि धोरणात्मक संबंध मजबूत करण्याच्या उद्देशाने हे धोरण सुरू करण्यात आले होते; परंतु आता म्यानमार आणि बांगलादेशमधील बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे त्यात अडथळे येत आहेत.***

प्रा. डॉ. विजयकुमार पोटे

म्यानमारमध्ये सुरू असलेले भयंकर गृहयुद्ध आणि बांगलादेशमधील राजकीय गोंधळाच्या पार्श्वभूमीवर भारताचे ‘अॅक्ट ईस्ट’ धोरण धोक्यात आले आहे. भारताच्या ईशान्य आणि आग्नेय आशियामधील आर्थिक आणि धोरणात्मक संबंध मजबूत करण्याच्या उद्देशाने हे धोरण सुरू करण्यात आले होते; परंतु आता म्यानमार आणि बांगलादेशमधील बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे त्यात अडथळे येत आहेत. म्यानमारमध्ये परिस्थिती बिघडत आहे. सत्ताधारी लष्करी जंटा (तत्माडॉ) आणि विविध जातीय बंडखोर गटांमध्ये सुरू असलेल्या संघर्षाने देशाला गृहयुद्धाच्या स्थितीत ढकलले आहे. भारताच्या महत्त्वाकांक्षी कलादान मल्टी-मोडल ट्रान्सपोर्ट (केएमटी) प्रकल्पाचा एक मोठा भाग असलेल्या राखीन (पूर्वीचे अराकान) प्रांतावर म्यानमारचे सैन्य नियंत्रण गमावत आहे. आता राखीन प्रांताचा मोठा भाग म्यानमार-बांगलादेश सीमेवर स्वतंत्र राज्य स्थापन करण्याच्या प्रयत्नात असलेल्या विघटनवादी अरकान आर्मीच्या ताब्यात आहे. राखीन प्रांताचे प्रशासकीय मुख्यालय असलेल्या सित्तवे (पूर्वीचे अक्कियाब) ताब्यात घेण्यासाठी अरकान लष्कराने मोठ्या प्रमाणावर तैनाती सुरू केली आहे. हे शहर बंडखोरांच्या हाती जाणे हा म्यानमारचा मोठा सामरिक पराभव ठरेल आणि भारतासाठीही गंभीर संकट निर्माण होईल. अरकान आर्मीची ताकद केवळ तिच्या यशापुरती मर्यादित नाही, तर इतर बंडखोर गटांशी युती करून आपली स्थिती आणखी मजबूत करत आहे.

जुलैच्या उत्तरार्धात एमएनडीएए या कोकांग बंडखोर गटाने म्यानमारच्या सैन्याचा पराभव केला आणि चीनच्या सीमेवर असलेल्या उत्तर शान राज्यातील लशिओ शहर ताब्यात घेतले. म्यानमारच्या सैन्यासाठी हा मोठा पराभव होता, कारण त्यांच्या उत्तर-पूर्व कमांडचे मुख्यालय लशिओ येथे होते. काचिन इंडिपेंडन्स आर्मी (केआयए) ने बर्मी सैन्याविरूद्ध महत्त्वपूर्ण विजय मिळवला. त्यांनी काचिन राज्यातील बर्मी लाइट इन्फंट्री बटालियन (एलआयबी) ४३७ चे मुख्यालय ताब्यात घेतले. या विजयांमुळे प्रेरित होऊन अरकान आर्मीने आता म्यानमारपासून औपचारिकपणे स्वातंत्र्य घोषित करण्यासाठी सिटवे ताब्यात घेण्याची योजना आखली आहे. भारतासाठी ही परिस्थिती आणखी गुंतागुंतीची आहे. भारताने राखीन राज्यातील ‘कलादान मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट’अंतर्गत सिटवे बंदराच्या आधुनिकीकरणासाठी ४८४ दशलक्ष डॉलरची गुंतवणूक केली आहे. भारतातील ईशान्येकडील राज्यांना म्यानमार आणि त्यापलीकडे दक्षिण-पूर्व आशियाशी जोडण्यासाठी हा प्रकल्प अतिशय महत्त्वाचा आहे; मात्र म्यानमारमधील बिघडलेल्या परिस्थितीमुळे हा प्रकल्प पूर्ण करण्यात अनेक अडथळे निर्माण होत आहेत. अरकान आर्मीने याआधी हा प्रकल्प उधळून लावला होता. भारतीय लष्कराने मिझोराम सीमेवर म्यानमारमधील त्यांच्या तळांवर ऑपरेशन सनशाईन सुरू केले होते. तथापि, गेल्या वर्षी अरकान आर्मीने सत्ताधारी लष्करी जंटाविरुद्धच्या मोहिमेदरम्यान राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी फायदेशीर ठरू शकणाऱ्या कनेक्टिव्हिटी प्रकल्पांना विरोध करणार नाही, असे सूचित केले.

अरकान आर्मीने म्यानमारपासून आपले स्वातंत्र्य घोषित केले आणि भारताने त्याला मान्यता दिली नाही, तर हा प्रकल्प पूर्णपणे धोक्यात येऊ शकतो. चीनने राखीन प्रांतातील खोल समुद्र बंदर आणि तेल-गॅस पाइपलाइनसारख्या मोठ्या प्रकल्पांमध्येही गुंतवणूक केली आहे. चीन रागावू नये म्हणून अरकान आर्मी क्यूकफ्यू बंदरावर हल्ला करणे टाळत असले तरी सिटवे ताब्यात घेण्याची त्यांची योजना चीनसाठी डोकेदुखी ठरू शकते. कोलकाता-बँकॉक महामार्ग हा भारताच्या ‘अॅक्ट ईस्ट’ धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. तो त्रिपक्षीय महामार्ग म्हणून ओळखला जातो. भारत, म्यानमार आणि थायलंडमधील संपर्क वाढवणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे; परंतु म्यानमारमधील बिघडलेल्या परिस्थितीमुळे तो पूर्ण आणि कार्यान्वित करणे आता कठीण होत आहे. शेख हसीना यांना बडतर्फ केल्यानंतर, बांगलादेशमधील विरोधी पक्ष भारतासोबत केलेल्या करारांच्या पुनरावलोकनाची मागणी करत आहेत. त्यामुळे भारताचे ‘अॅक्ट ईस्ट धोरण आणखी अडचणीत येऊ शकते. म्यानमारमधील गृहयुद्ध आणि राखीन प्रांतातील अरकान आर्मीचा वाढता प्रभाव यामुळे भारताच्या कनेक्टिव्हिटी प्रकल्पांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. परिणामी, येत्या काही महिन्यांमध्ये भारताला सुदूर पूर्व धोरणांतर्गत आपल्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी नवीन धोरणात्मक उपाय शोधावे लागतील.

भारताचे ‘अॅक्ट ईस्ट’ धोरण हे दक्षिण-पूर्व आशियाई देशांना गुंतवून ठेवण्याच्या उद्देशाने धोरणात्मक चौकट आहे. म्यानमारमध्ये सुरू असलेल्या नागरी अशांततेमुळे, व्यापार, सांस्कृतिक आणि जमीन मार्गांद्वारे होणारी देवाणघेवाण मागे पडली आहे. आग्नेय आशियाई देशांना व्यापार, वाणिज्य आणि बहुपक्षीय गुंतवणुकीद्वारे अधिक समंजसपणे जोडण्याचा भारताचा प्रयत्न आहे. प्रादेशिक खेळाडू बनण्याच्या भारताच्या महत्त्वाकांक्षेशी या धोरणाचे उद्दिष्ट सुसंगत आहे. या धोरणाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्याची भौगोलिक खोली. भारतीय पंतप्रधान आणि त्यांच्या राजनयिक सहभागामुळे या क्षेत्रामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. प्रारंभी, म्यानमार, दक्षिण कोरिया आणि थायलंड हे पूर्व आशियाशी भारताच्या संलग्नतेची जाणीव करून देण्यासाठी महत्त्वाचे भागीदार मानले जात होते. मात्र त्यानंतर लक्षात आले की या प्रदेशातील अधिक देशांशी आर्थिक संबंध हा या भागावरील वाढत्या प्रभावाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. पूर्वीचे ‘एलईपी’ फक्त आशियाई देशांशी केंद्रित होते, तर पुनरुज्जीवित ‘एईपी’ने आशिया पॅसिफिकचा समावेश करून आपली धोरणात्मक खोली वाढवली.

पूर्व आणि दक्षिण-पूर्व आशियाशी सागरी मार्गांद्वारे ‘कनेक्टिव्हिटी’ साधत भारताने प्रगती साधली आहे; परंतु जमिनीवरील मार्गदेखील महत्त्वाचे आहेत आणि ही कनेक्टिव्हिटी सुलभ करण्यात म्यानमारची भूमिका महत्त्वाची आहे. या धोरणात्मक चौकटीत ईशान्य भारताला प्राधान्य देण्यात आले आहे. ‘अॅक्ट ईस्ट’ धोरणाच्या कोणत्याही यशासाठी आणि पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेची खात्री करण्यासाठी ‘नॉर्थ ईस्ट’ हा महत्त्वाचा पाया आहे. या धोरणाचे यश, विशेषत: ईशान्येकडील भूमार्गांबाबत, म्यानमारशी स्थिर आणि मैत्रीपूर्ण संबंधांवर अवलंबून आहे.

फेब्रुवारी २०२१ मध्ये झालेल्या लष्करी बंडानंतर म्यानमारमध्ये अराजकता पसरली आहे. आंग सान स्यू की यांच्या सरकारने सुरू केलेली युद्धविराम प्रक्रिया कोलमडली आहे. त्यामुळे हिंसाचारात वाढ झाली असून नोव्हेंबर २०२३ पासून अनेक वांशिक बंडखोर गटांनी समांतर प्रशासनाची स्थापना केली आहे. या परिस्थितीमुळे म्यानमारचे तुकडे होण्याच्या मार्गावर आहे आणि जागतिक समुदायापासून ते अलिप्त झाले आहे. म्यानमारचे राजकीय भूदृश्य जटिलतेने भरले आहे. त्यात लष्करी जंटा आणि बहुजातीय राज्यांची नाजूकता यांचा समावेश आहे. त्यामुळे भारताने आणखी अस्थिरता आणि संघर्ष वाढण्याची शक्यता कमी लेखू नये. काही अंदाजांनुसार, राखीन राज्याचा ६० टक्के आणि शेजारील राज्याचा ३० टक्के भाग अरकान लष्कराच्या ताब्यात आहे.

म्यानमारच्या अंतर्गत संकटात आजघडीला प्रभावीपणे हस्तक्षेप करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाच्या त्वरित कारवाईची आवश्यकता आहे. भारत प्रादेशिक प्रभाव आणि मुत्सद्दी कौशल्याद्वारे संकटाचे निराकरण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. भारताने अर्थपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याची हीच वेळ आहे. याच सुमारास म्यानमारसह १६४३ किलोमीटर सीमारेषेवर कुंपण घालण्याचा भारताचा अलीकडील निर्णय अधिक बचावात्मक भूमिकेकडे बदल दर्शवतो. हा निर्णय ‘अॅक्ट ईस्ट’ धोरणांतर्गत खुल्या प्रतिबद्धतेच्या तत्त्वांच्या विरोधात आहे. या प्रदेशात चीनचा वाढता प्रभाव आणि लष्करी जंटा आणि वांशिक गटांमधील चर्चेत त्याचा सहभाग यामुळे भारताला त्याचे ‘अॅक्ट ईस्ट’ वचन पूर्ण करण्यासाठी आव्हानात्मक स्थिती दिसते. परिस्थिती आणखी जटिल बनून ‘केएमएमटी’ सारख्या भारत-अनुदानित पायाभूत सुविधा प्रकल्पांना विलंब होत आहे. म्यानमारशी संपर्क आणि व्यापार संबंध मजबूत करण्याच्या प्रयत्नांना आणखी अडथळा आणत आहेत. काही भागात सुरू असलेला संघर्षही हे प्रकल्प सुरू होण्यात अडथळा ठरत आहे. परिस्थिती भरून येण्यासारखी नसली, तरी भारताकडून निर्णायक कारवाईची गरज आहे. धोरणात्मक निष्क्रियता चुकीचे निर्णय घेण्याइतकीच हानीकारक असू शकते. त्यामुळे भारताने या आव्हानांवर मात करण्यासाठी निर्णायक कृती केली पाहिजे आणि ‘अॅक्ट ईस्ट पॉलिसी’शी आपली वचनबद्धता कायम ठेवली पाहिजे.

आजकाल

# परप्रांतियांना शेतजमीन खरेदीस मनाईची मागणी

मध्यप्रदेश व राजस्थानमधील शेतकरी दाखले वापरून राज्यात विशेषतः कोकणात परप्रांतीयांकडून मोठ्या प्रमाणावर शेतजमीन खरेदी होत असल्याचा आरोप जनता दल (से) पक्ष व कोकण जनविकास समितीने केला असून, उत्तराखंड प्रमाणे राज्यात परप्रांतियांना शेतजमीन खरेदी करण्यास मनाई करावी, अशी मागणी केली आहे.

स्थानिक जनतेच्या गरिबीचा फायदा घेऊन, मोठ्या प्रमाणावर राज्यातील आणि राज्याबाहेरील व्यक्ती कोकणात शेत जमिनीची खरेदी करीत आहेत. मूळचे राजस्थानमधील असलेल्या बलराम जाखड व उत्तर प्रदेश मधील कृपाशंकर सिंग यांच्यासारख्या अनेकांनी कोकणात जमिनी विकत घेतल्या आहेत. नाणार परिसरातही अनेक गुजराती व्यक्तींनी जमिनी विकत घेतल्याचे यापूर्वीच उघड झाले आहे. अलीकडे राजापूर तालुक्यात पुण्यातील एका परप्रांतीय व्यक्तीने तब्बल दोनशे एकर जागा खरेदी केल्याची चर्चा आहे. अख्खा गाव विकत घेण्याचे कांदाटी खोऱ्यातील प्रकरणही असेच आहे.

राज्यात शेतजमीन खरेदी करण्यासाठी खरेदीदार व्यक्तीकडे शेतकरी दाखला असणे गरजेचे असते. परंतु ज्याच्याकडे असा दाखला नसतो, त्यांना राजस्थान - मध्यप्रदेश या राज्यात संबंधित व्यक्तीच्या नावे जमीन खरेदी करून त्या आधारे दलाल शेतकरी दाखला मिळवून देतात. या दाखल्याच्या आधारे राज्यात विशेष करून कोकणात परप्रांतीय व्यक्ती जमीन खरेदी करीत आहेत, असे जनता दलाचे प्रदेश अध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे, मुंबई अध्यक्ष प्रभाकर नारकर तसेच कोकण जनविकास समितीचे जगदिश नलावडे, सुरेश रासम, संजय परब, प्रशांत गायकवाड यांनी म्हटले आहे.



जमीन खरेदीसाठी राजस्थान वा मध्यप्रदेशमध्ये न जाताच घरबसल्या अवघ्या ३५ ते ४५ हजार रुपयांत तेथील शेतकरी असल्याचा दाखला दलाल मिळवून देतात. ही प्रक्रिया २० दिवस ते दीड महिन्यात पार पाडली जाते. त्यामुळे मुळातच हे दाखले बनावट असण्याची शक्यता आहे. हे दाखले खरे आहेत, असे गृहित धरले तरी संबंधित व्यक्ती राजस्थान वा मध्य प्रदेशमध्ये शेत जमिनीची मालक होऊ शकेल, पण तेथे न जाताच व सदर जमीन न कसताच शेतकरी कशी बनू शकेल, असा सवाल या सर्वांनी राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना दिलेल्या निवेदनात केला आहे.

जानेवारी २०२४ मध्ये उत्तराखंड सरकारने राज्यातील शेत जमिनीची राज्याबाहेरील व्यक्तींनी खरेदी करण्यास बंदी आणली आहे. तसेच अकृषिक (एनए) जमीन खरेदीसाठीही २५० चौरस मीटर जागेची मर्यादा घातली आहे. याच आधारे राज्यात आणि विशेष करून कोकणात परप्रांतीयांना शेतजमीन खरेदी करण्यास मनाई करावी. याबाबत काही तांत्रिक व कायदेशीर अडचणी येणार असतील तर परराज्यात जमीन खरेदी करून शेतकरी दाखला मिळविल्यानंतर, संबंधित जागेवर प्रत्यक्ष शेती केल्याचे पुरावे मागण्यात यावेत वा किमान तीन ते पाच वर्षात महाराष्ट्रात जमीन खरेदी करण्यास प्रतिबंध करण्यात यावा, असे या सर्वांनी म्हटले आहे.

उद्योग-हॉटेल यासाठी कोणी अकृषिक जमीन खरेदी करणार असेल तर त्यासाठी क्षेत्र मर्यादा ठरवून देण्यात यावी व त्या व्यवसायासाठी सदर जमिनीचा तीन वर्षात वापर न करण्यात आल्यास सदर जमीन सरकारने ताब्यात घेण्याची तरतूद करावी, अशी मागणीही महसूल मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

गेल्या दहा वर्षात बाहेरील राज्यातील शेतकरी दाखल्याच्या आधारे राज्यात व कोकणात शेतजमीन खरेदीचे जे व्यवहार झाले आहेत, ते तपासण्याचे आदेश देऊन, बनावट दाखल्यांच्या आधारे झालेले व्यवहार रद्द करावेत, असेही या निवेदनात म्हटले आहे.

लोकसंसद

## वाहतूक नियम पाळणे उठले जीवावर

नवी मुंबईतील सीबीडी येथील उड्डाणपुलाखाली सिग्नल लागल्यामुळे रस्त्यावर थांबलेल्या दुचाकीला पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या एका कारने धडक दिल्यामुळे दुचाकीवरील महिलेचा मृत्यू झाला तर तिचा पती गंभीर जखमी झाला. या दुर्दैवी घटनेमुळे वाहतूक नियम पाळणे त्या दाम्पत्याच्या कसे जीवावर उठले याचा प्रत्यय आला. खरेतर प्रामाणिकपणे वाहतूक नियम पाळून सिग्नलला थांबलेल्या गाडीला वाहतूक नियम न पाळणाऱ्यांकडून भरधाव वेगाने येऊन पाठीमागून धडक देण्याच्या अनेक घटना अलीकडच्या काळात घडल्या आहेत. त्यात अनेकांचे मृत्यू झाले आहेत. एकीकडे शासन म्हणते वाहतूक ‘नियम’ पाळा आणि ‘यम’ टाळा. पण अनेक वेळा वाहतूक नियम पाळणाऱ्यांनाच दुसऱ्यांच्या चुकीमुळे दुर्दैवाने ’यम’सदनी जावे लागत आहे. वास्तविक वाहतूक सुरक्षेच्या संदर्भात जनजागृती मोठ्या प्रमाणावर होत असू-नही वाहतूक नियम तोडणाऱ्यांची संख्या कमी होत नाही. दंड भरू पण नियम पाळणार नाही अशी मानसिकता झाल्यामुळे पोलिसांच्या कारवाईचा धाक वाहन चालकाच्या राहिला नाही. अशा परिस्थितीत जीवघेण्या अपघातांना कारणीभूत असलेल्या वाहन चालकांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाईची गरज आहे.

**-प्रदीप शंकर मोरे**

# मराठी साहित्यिक दिनविशेष

**१२ सप्टेंबर**

**१९१३:** - साहित्य, संगीत, नाटय यांची अभिरुची असलेले लेखक, वकील वामन उध्दव आठल्ये यांचा जन्म. काही स्मृतिग्रंथाचे यांनी संपादन केले. याशिवाय ’वक्रचंद्रमा प्रसेना राहू’ हे २००१: संगीत नाटक आणि ’संभावितांचा काळाबाजार’ ही संगीत नाटिका अशी साहित्यसंपदा त्यांच्या नावावर आहे. **१९१८ :-** कथालेखिका, कादंबरीकार शशिकला बाबुराव आंदळकर यांचा जन्म. ’सीमा’ या कादंबरीतून सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह. तसेच ’आकाशदिवा’, ’एकटाच गाऊ दे’ ही नाटके आणि ’छटा’, ’मनोरे’ हे लघुकथासंग्रह आदी साहित्य प्रकाशित. **१९२६:-** मराठी वाङ्:मयाचा इतिहास मांडणाऱ्या ’महाराष्ट्रसारस्वत’ या ग्रंथाचे कर्ते व दिवंगत कवींच्या हस्तलिखितांसाठी ’महाराष्ट्रकवी’ हे मासिक चालविणारे संशोधक विनायक लक्ष्मण भावे यांचे निधन. त्यांनी ’मराठी दप्तर संस्था’ सुरु केली होती. इतिहास हा त्यांच्या आवडीचा विषय. ’अफझलखानाचा वध’, ’शाहिस्तेखानाची मोहीम’, ’चक्रवती नेपोलियन’ या पुस्तकांसह ’संत तुकारामांच्या अस्सल गाथा’, ’रुक्मिणीहरण’, ’शिशुपाल वध’ अशी संपादने आणि ’बरसा’ या नावाने त्यांचे स्फुटलेख संकलित करण्यात आले. **१९३२:-** लेखिका विजया जहागीरदार यांचा जन्म. ’वास्तु’, ’अर्धविराम’, ’मनगुंफा’, ’रणयोगिनी’ मिळून ११ कादंबऱ्या. तसेच ’बिन पानाची झाडे’, ’वेंधळी’, ’शापित गुलमोहर’, ’कालचक्र’ मिळून ९ कथासंग्रह याशिवाय ’आकाश मोगरा’, ’गीतगीता’, ’स्त्री नक्षत्र’ मिळून ६काव्यसंग्रह,’भ्रमनिरास’ हे नाटक आणि त्यांच्या बालसाहित्यात ५ कथासंग्रह, दोन कादंबरीका, छून छून गाणी, मखमली झूला मिळून ९काव्यसंग्रह. लपाछपी भाग १ व २, हरिणाताई संशोधक’ ही मनोरंजक विज्ञानाची पुस्तके लिहून मराठी साहित्यात मोलाची भर घातली. **१९३७ :-** लेखिका, कथाकथनकार प्रा. कुंदा रघुवीर देसाई यांचा जन्म. ’ऋणानुबंध’, ’पाऊलवाट’ हे दोन कथासंग्रह प्रकाशित. ’साद देती हिमशिखरे’ हे प्रवासवर्णन प्रकाशित. तसेच ’अष्टपदी’, ’रोहिणी’, ’अश्विनी’, ’काव्यगंध’ इत्यादी कविता संग्रहात कविता, कथा समाविष्ट. याशिवाय दिवाळी अंकातून सातत्याने लेखन. **१९४५ :-** लेखिका प्रा. डॉ. संजीवनी अरविंद देशमुख यांचा जन्म. ’अग्निफुले’, ’अपरिमिता’, ’विफला’, ’स्वप्नात नाही आले’ या कादंबरीसह ’कॅरेक्टर’ हा कथासंग्रह आणि ’तंजावरच्या भोसले राजांची नाटके संपदा. एक चिकित्सक अभ्यास’ हा प्रबंध अशी साहित्य **१९५६ :-** लेखक राजीव नाईक यांचा जन्म. ’अखेरचे पर्व’, ’आपसातल्या गोष्टी’, ’साठेचं काय करायचं?’ अशी प्रायोगिक नाटकेही त्यांनी लिहिली आहेत. ’गॅलिलिओ’, ’मातीच्या गाडयाचं प्रकरण’, ’ऐन वसंतात अर्ध्या रात्री’ आदी रुपांतरीत नाटकेही लिहिली. मराठी नाटकांचे चिन्हमीमांसा करणारे ते पहिले समीक्षक आहेत. **१९९१** - स्त्रीमुक्तीचा उद्गार साहित्यातून मांडणाऱ्या विदुषी गीता जनार्दन साने यांचे निधन. ’निखळलेली हिरकणी’, ’वठलेला वृक्ष’, ’लतिका’ या कादंबऱ्यांतून’ स्त्रीमुक्तीचा पुरस्कार त्यांनी केला, तर ’आविष्कार’, ’धुके आणि दहिवर’ या कादंबऱ्यात राजकीय स्थितीचे चित्र रंगविले. ’दीपस्तंभ’ ही समाजक्रांतीचे स्वप्न रंगवणारी कादंबरी. चंबळच्या खोऱ्यात स्वतः ’फिरुन ’चंबळची दस्युभूमी’ हे पुस्तक तसेच ’भरतमुनीचे नाटयशास्त्र’ या ग्रंथाचे मराठी भाषांतर अशी त्यांची कर्तृत्व कमान ! ’भारतीय स्त्रीजीवन’ हे त्यांचे पुस्तक स्त्रीचिंतनात महत्त्वाचे आहे. २०१५:विविध विषयांवर ताकदीने नाटयलेखन करणारे नाटककार सुरेश चिखले यांचे निधन. वेश्यांच्या जीवनावरील ’गोलपिठा’, ’जांभुळ आख्यान’, ’खंडोबाचं लगीन’ आणि सध्या सुरु असलेले ’प्रपोजल’ ही त्यांची गाजलेली नाटके आहेत. व्यावसायिक रंगभूमीवर त्यांनी काही निवडक नाटके लिहिली असली तरी नाटकांमधील विषयाच्या वैविध्यामुळे ती नाटके रंगभूमीवर गाजली. चिखले हे ’इंडियन नॅशनल थिएटर’ अर्थात ’आयएनटी’ च्या मुशीतून घडलेले लेखक होते. आंतरमहाविद्यालयीन विविध एकांकिका स्पर्धांमधून ते सहभागी झाले होते. त्यावेळी चिखले यांनी लेखनाबरोबरच अभिनयही केला होता. कॉ. कृष्णा देसाई खून खटल्यावर आधारित त्यांनी लिहिलेल्या एकांकिकेला ’आयएनटी’ च्या स्पर्धेत लेखन आणि दिग्दर्शनाचे पारितोषिक मिळाले होते. तर ’गुरु’ नावाच्या एकांकिकेसाठी त्यांना अभिनयाचेही पारितोषिक मिळाले होते. ’आयएनटी’ च्या ’ती फुलराणी’, ’कोडी’ या नाटकात चिखले यांनी अभिनय केला होता.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१२ सप्टेंबर

१) श्री.गणेश महादेव आठवले
१२-०९-१९३४
अलिबाग

२) श्रीम. सुजाता पांडुरंग दळी
१२-०९-१९४५
अलिबाग, रायगड

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# जिल्ह्यातील पर्ससीन मासेमारी अडचणीत

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**



रत्नागिरी जिल्ह्यातील पर्ससीन नेट मासेमारीला राज्याच्या समुद्र क्षेत्रात मासेमारी करण्यासाठी एकही परवाना देण्यात आलेला नाही. यामुळे अनेक नौकामालकांची कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक धोक्यात आली आहे. नौकामालक यामुळे अस्वस्थ झाले असून, पर्ससीन नेट नौका विकण्याचा सपाटा सुरू झाला आहे. काही पर्ससीन नेट नौका राज्याच्या समुद्र क्षेत्राबाहेर म्हणजे १२ नॉटिकल मैलांच्या पुढे खोल समुद्रात मासेमारीसाठी जात आहेत. यामुळे नौकामालकांचा आर्थिक खर्च देखील वाढला आहे.

पर्ससीन नेट मासेमारीला १ सप्टेंबरपासून सुरूवात झालेली आहे. राज्याच्या समुद्र क्षेत्रात मासेमारी करण्यासाठी या नौकांना सहाय्यक मत्स्य व्यवसाय आयुक्त कार्यालयाकडून मासेमारी नौका नूतनीकरण परवाना, बंदर परवाना दिला जातो. परंतु, चालू हंगामात सहाय्यक मत्स्य व्यवसाय आयुक्त कार्यालयाकडून कोणताही परवाना दिला गेलेला नाही. राज्यातील मासेमारी धोरणाचा सोमवंशी अहवालानुसार रत्नागिरी जिल्ह्याच्या १६७ कि.मी. समुद्र क्षेत्रात १८३ पर्ससीन नेट नौका ठेवण्याचे सूचित करण्यात आले आहे. अहवालातील इतर सूचनांनुसार फेब्रुवारी २०१६ साली राज्य शासनाच्या अध्यादेशानुसार पर्ससीन नेट मासेमारी आठ महिन्यांवरून चार महिन्यांवर आणण्यात आली होती. शासनाने आता तर नौका नूतनीकरण परवाने देण्याबाबत सूचना केलेल्या नाहीत. यामुळे एकाही पर्ससीन नौकेला सहायक मत्स्य व्यवसाय विभागाकडून कोणताही परवाना देण्यात आलेला नाही.

जिल्ह्यात ४७४ पर्ससीन नौका होत्या. खर्चाच्या तुलनेत मासे न मिळणे, समुद्रातील वातावरणाची अनिश्चितता अशा विविध कारणांमुळे पर्ससीन नेट नौका कमी होत गेल्या आहेत. गेल्या वर्षी या नौकांची संख्या २८० पर्यंत आली होती. शासनाच्या सूचनेनुसार १८३ नौकांनाच परवाने देण्याची तयारी सुरू होती; परंतु या संदर्भात परवाना नूतनीकरणाबाबत कोणतेही निर्देश न आल्याने एकाही नौकेला राज्याच्या सागरी क्षेत्रात मासेमारी करण्याची परवानगी देण्यात आलेली नाही. यामुळे अनेक पर्ससीन नेट नौका नाहिलाजाने विकल्या जात आहेत. तसेच, अनेक नौका बंदरातच उभ्या ठेवण्यात आल्या असून काही नौका राज्याच्या समुद्र क्षेत्राबाहेर म्हणजेच केंद्राच्या अधिकार क्षेत्रातील समुद्रात मासेमारीसाठी जात आहेत. हे अंतर मोठे असल्याने नौकेचे इंधन व इतर खर्च अधिक वाढला आहे.

## इस्टेट एजंटची बनवाबनवी

**। पालघर । प्रतिनिधी ।**




मीरा रोड येथे राहणाऱ्या हिना अब्दुल सलमानी (३६) यांना मीरारोड येथे हेवी डिपॉझिटवर फ्लॅट भाड्याने पाहिजे होता. १८ ऑगस्ट रोजी एका संकेतस्थळावर फ्लॅटचा शोध करत असता त्यांना एक फ्लॅट आवडल्याने त्यांनी इस्टेट एजेंट कुणाल सिंग याच्याशी संपर्क केला. यावेळी इस्टेट एजंट कुणाल सिंगने त्याचा मित्र शाहरुख अहमद याच्याशी संपर्क साधायला सांगितला. यानंतर इस्टेट एजंट शाहरुखने हिना यांना संबंधित फ्लॅट दाखविला. तसेच, सोबत एक इसम हा फ्लॅटचा मालक असल्याचे सांगण्यात आले. हिना यांना फ्लॅट आवडल्याने त्यांनी रुम मालकासोबत हेवी डिपॉझिटचा करार केला. यासाठी रूम मालकाला ९ लाख ५० हजार रुपये देण्यात आले होते.

यानंतर २२ ऑगस्ट रोजी हिना सलमानी यांनी रुमचा ताबा मिळण्यासाठी इस्टेट एजंट आणि रुम मालकांना फोन केला असता त्यांचे फोन बंद आले. यावेळी त्यांनी सोसायटीमध्ये जाऊन शाहनिशा केली असता संबंधि व्यक्ती ही बनावट इस्टेट इजेंट आणि तोतया मालक असल्याचे त्यांना समजले. त्यांनी या घडलेल्या प्रकाराची शाहनिशा केली असता त्यांची फसवणूक झाल्याचे उघड झाले. त्यांनी ५ सप्टेंबर रोजी बनावट इस्टेट इजंट आणि तोतया रुम मालक यांच्या विरुद्ध काशिगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता.

या गुन्ह्याच्या तपासात आरोपीचा तपास करून शाहरुख नियाज अहमद (२८), आफताफ मोहनुजमा आलम (४५), रमेश गिसीअवन शर्मा (३७) हे तिघेही मीरारोड येथे राहणारे असून त्यांना अटक करण्यात आली आहे.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

कुडाळ येथील एक अल्पवयीन मुलगी मंगळवारी (दि.३) बाजारात जाऊन येते असे सांगून गेली असता ती परत घरी आलीच नाही. याबाबत पालकांनी तिचा शोध घेतला, परंतु ती सापडली नाही. याबाबत सोमवारी (दि.९) कुडाळ पोलीस ठाण्यात माहिती दिली. अपहरण झालेली मुलगी ही अल्पवयीन असल्याने या घटनेचे गांभीर्य ओळखून कुडाळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र मगदुम यांनी तात्काळ दखल घेत अपहरण झालेल्या मुलीबाबत संशयीत आरोपीताबाबत गोपनीयरित्या व तांत्रीक विश्लेषणाधारे माहीती काढली. यानंतर आरोपी व अपहरण झालेली अल्पवयीन मुलगी ही रत्नागिरी येथे असल्याची माहीती मिळाली. यानंतर कुडाळ पोलीसांनी रत्नागिरी पोलीसांना याबाबत माहीती देऊन आरोपीच्या ठावठिकाण्याबाबत माहीती दिली. या माहितीच्या आधारे आरोपीला अपहरण केलेल्या मुलीसह ताब्यात घेऊन हा गुन्हा तात्काळ उघडकीस आणलेला आहे.

## मनोरुग्णालयाचे कोल्हापुरात स्थलांतर

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**




इंग्रजांच्या काळापासून रत्नागिरीत सुरू असलेले प्रादेशिक मनोरुग्णालय कोल्हापुरातील जयसिंगपूर उदगाव येथे सुरू करण्याच्या हालचाली सुरू झालेल्या आहेत. आकृतिबंधानुसार मंजूर असलेली पदे उदगाव येथील ३६५ खाटांच्या प्रादेशिक मनोग्णालयासाठी वर्ग करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. यामुळे रत्नागिरीतील मनोरुग्णालय बंद होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या या ठिकाणी १३० रुग्ण कार्यरत असून, अधिकारी, कर्मचाऱ्यांची ५० टक्के पदे रिक्त आहेत. रत्नागिरीतील प्रादेशिक मनोग्णालय रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यांसाठी आहे. रुग्णालयास सुमारे ३६५ खाटांची मंजुरी आहे.

या रुग्णालयात एकूण १४४ मंजूर पदे आहेत. यापैकी ५० टक्के पदे रिक्त आहेत. यात वर्ग १ आणि चतुर्थश्रेणी, ब गट, क गट अशा पदांचा समावेश आहे. रुग्णांची संख्या अधिक असल्याने या रुग्णांची देखभाल करण्यासाठी आवश्यक असलेली कार्यालयीन पदे रिक्त आहेत. रुग्णांच्या सुरक्षेच्यादृष्टीने रुग्णालय प्रशासनाला कमी कर्मचाऱ्यांमध्येच सध्या लक्ष ठेवावे लागत आहे. त्यामुळे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर मोठा ताण येत आहे.

तसेच, कोल्हापूर, सांगली व सातारा आणि सीमाभागातील रुग्णांना व त्यांच्या नातेवाइकांना मनोरुग्णालयात पुणे किंवा रत्नागिरी येथे जावे लागते. यामुळे गेली अनेक वर्षे कोल्हापूरमध्ये मनोरुग्णालय व्हावे यासाठी प्रयत्न सुरू होते. पश्चिम महाराष्ट्रातील रुग्ण व नातेवाइकांची अनेक वर्षांपासूनची मागणी लक्षात घेत कोल्हापूरमधील शिरोळ तालुक्यातील उदगाव येथे रत्नागिरीच्या धर्तीवर ३६५ खाटांचे प्रादेशिक मनोग्णालय स्थापन करण्याबाबतच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाची मान्यता मिळालेली आहे.

## अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार

**। पालघर । प्रतिनिधी ।**

नालासोपाऱ्यात १० वर्षीय मुलीवर दोन जणांनी सामूहिक लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. यापूर्वी सुद्धा नालासोपारा पूर्वेच्या भागात १७ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना घडली होती.

नालासोपारा पूर्वेच्या शिर्डीनगर परिसरात १० वर्षीय पीडित मुलगी आपल्या कुटुंबासोबत राहत आहे. २ सप्टेंबर रोजी पीडीत मुलगी घरी परतत असताना घराच्या जवळच्या परिसरात दोन व्यक्तींनी तिला रस्त्यात अडवून तिला निर्जन स्थळी नेऊन तिच्यावर आळीपाळीने लैंगिक अत्याचार केला. या पीडित मुलीचे कपडे रक्ताने खराब झाले होते. तसेच, तिची प्रकृती ठीक नसल्याने घरच्यांना मुलीसोबत गैरप्रकार घडल्याचा संशय आला. मुलीची चौकशी केली असता घडलेला सर्व प्रकार आपल्या पालकांना सांगितला. यानंतर तिच्या घरच्यांनी आचोळे पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली असून पोलिसांनी गुन्हा दाखल करत या दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

## गुणवत्ता व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित

**। ठाणे । प्रतिनिधी ।**



ठाणे शहराला एका बाजूला खाडी आणि दुसरीकडे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांची साथ लाभली असल्याने इतर कोणत्याही शहराच्या तुलनेत ठाण्यातली हवा चांगली असते. मात्र, ही हवा सर्वकाळात उत्तम रहावी, यासाठी 'हवा गुणवत्ता व्यवस्थापन यंत्रणा' या नवीन ऑनलाइन साधनाचा नक्कीच उपयोग होईल, असे ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव यांनी सांगितले आहे.

ठाणे महानगरपालिकेसाठी कौन्सिल ऑन एनर्जी एन्व्हायरमेंट अँड वॉटर (सीईईडब्ल्यू) आणि युएसएड यांनी संयुक्तपणे ही ऑनलाइन यंत्रणा विकसित केली आहे. या यंत्रणेचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले. ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर मिळणाऱ्या माहितीचा उपयोग नागरिकांनाही व्हावा, यासाठी लवकरच त्याची एक लिंक ठाणे महानगरपालिकेच्या वेबसाईटवर देण्यात येणार असल्याचे आयुक्त राव यांनी जाहीर केले आहे. हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी, वेगवेगळ्या शहरात अस्तित्वात असलेल्या वेगवेगळ्या परिस्थितीनुसार उपाययोजना करण्याची गरज असते. हवेचे प्रदूषण आणि वातावरण बदल यांचा अन्योन्य संबंध आहे. हे लक्षात घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी 'क्लीन एअर आणि बेटर हेल्थ' या प्रकल्पांतर्गत ठाणे महापालिकेसाठी 'हवा गुणवत्ता व्यवस्थापन यंत्रणा' तयार करण्यात आली आहे. या यंत्रणेमुळे ठाणे महापालिकेला हवा प्रदूषणाशी सामना करण्यासाठी योग्य अशी माहिती मिळेल. त्यातून उपाययोजना करता येतील. राज्यात अशाप्रकारे प्रथमच ही यंत्रणा सुरू होत आहे, असे प्रतिपादन 'यूएसएड इंडिया' या संस्थेचे उपसंचालक वर्गीस पॉल यांनी केले.

## व्यावसायिकाची आत्महत्या

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील वाटद खंडाळा येथील चप्पल व्यावसायीकाने सोमवारी (दि.९) दुकानातच गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. अनिल काशिराम खेडेकर (४२) असे त्यांचे नाव आहे. अनिल खेडेकर यांचा वाटद खंडाळा येथे चप्पल विक्रीचा व्यवसाय आहे. मात्र, गेला काही काळ तो व्यवस्थित चालत नसल्यामुळे काही दिवसांपासून ते फार तणावात होते. या नैराश्यातून त्यांनी आपल्या दुकानातच गळफास घेतल्याचे समोर आले आहे.

## ऑनलाईन शॉपिंग विरोधात धोरण




**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

ऑनलाईन शॉपिंगमुळे चिपळूण बाजारपेठेचे ४० टक्के नुकसान झाले आहे. ऑनलाइन शॉपिंगचा बाजार असाच चालू राहिला तर पुढील दहा वर्षांनंतर किरकोळ व्यापारी राहतील की नाही याबाबत शंका व्यक्त करण्यात येत आहे. यासाठी गणेशोत्सवानंतर व्यापाऱ्यांचा चिपळूण शहरात मेळावा होणार आहे.

गणेशोत्सवानंतर होणाऱ्या व्यापाऱ्यांचा मेळाव्यात प्रामुख्याने ऑनलाईन शॉपिंगच्या विरोधातील धोरण ठरवले जाणार आहे. याबाबत माहिती देताना व्यापारी संघटनेचे माजी अध्यक्ष शिरीष काटकर म्हणाले की, यावर्षी बाजारपेठेत गर्दी होती; परंतु बहुतांशी नागरिकांनी ऑनलाईन खरेदीला प्राधान्य दिले आहे. यामुळे बाजारपेठेतील गर्दीचा व्यापाऱ्यांना म्हणावा तसा फायदा झालेला नाही. ऑनलाईन व्यापार करणाऱ्या कंपन्यांमध्ये पूर्वी सरकारचा ५१ टक्के आणि या कंपन्यांचा ४९ टक्के हिस्सा होता. आता ऑनलाइन शॉपिंगमध्ये सरकारची भागीदारी पूर्णपणे संपली आहे. ब्रँडेड कंपन्या किरकोळ व्यापारांना चांगला नफा देण्यास तयार नाहीत. जीएसटी, इन्कम टॅक्स, कामगारांचा पगार, वीजबिल, स्थानिक स्वराज्य संस्थेचे कर आणि इतर किरकोळ खर्च स्थानिक व्यापारांना भागवाये लागत आहे.

तसेच, ऑनलाईन शॉपिंग करताना कंपनी देईल ती वस्तू ग्राहकांना स्वीकारावी लागते. स्थानिक बाजारपेठेत खरेदी करताना मात्र ग्राहक आवडीनुसार वस्तू निवडतात. या पार्श्वभूमीवर आम्ही चिपळूममधील व्यापारी स्थानिक पातळीवर आवाज उठवणार असल्याचे काटकर यांनी सांगितले.

## शिधावाटप दुकानात जिन्नसांचा अपहार

**। ठाणे । प्रतिनिधी ।**



अंबरनाथ येथील महालक्ष्मी नगरातील एका रेशनदुकानदाराला पामतेला समवेत अन्य शिधा जिन्नसांचा अपहार करताना स्थानिक नागरिकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. याप्रकरणी शिवाजी नगर पोलीस ठाण्यात शिधा वाटप दुकानदारासोबत त्याच्या साथीदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंबरनाथ पूर्व येथील महालक्ष्मी नगरात मैत्रिण ओद्योगिक उत्पाद सहकारी संस्थेच्या शिधावाटप दुकानात पामतेल आणि अन्न धान्याचा काळा बाजार होत असल्याचा संशय स्थानिक नागरिकांना आला होता. त्यांनी या दुकानावर पाळत ठेवत सोमवारी (दि.९) दुकानदार सुभाष भारती आणि त्याचा साथीदार कुंदन कुमार गुप्ता यांना शिधाधारकांना वितरित करण्यासाठी आणलेल्या पामतेल आणि इतर शिध्याचा काळा बाजार करत असताना पकडले. ही घटना समजताच अंबरनाथ रेशनिंग विभागाचे अधिकारी शशिकांत बाळकृष्ण पोटसुते यांनी घटनास्थळी धाव घेऊन शिधावाटप दुकानाची झाडाझडती घेतली असताना त्यांना पामतेल आणि अन्य शिधा जिन्न्स कमी प्रमाणात आढळून आले. त्यांनी रेशन दुकानदाराविरुद्ध अनधिकृतपणे जीवनावश्यक वस्तूंचा अपहार केल्याप्रकरणी पोलिसात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## रेल्वेस्थानकात पार्किंगचा बोजवारा

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**




चिपळूण तालुक्यातील सावर्डे रेल्वेस्थानकात पार्किंगचा बोजवारा उडाला आहे. रेल्वेस्थानकाच्या प्रवेशद्वारावर आणि दिव्यांगांसाठी असलेल्या रॅम्पजवळच काही कर्मचारी आणि अधिकारी स्वतःची वाहने उभी करून प्रवाशांची अडचण करीत आहेत. यामुळे ये-जा करणाऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. यामुळे वाहनचालक तसेच नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

चिपळूण तालुक्यातील सावर्डे येथील आगवे येथे रेल्वेस्थानक आहे. प्रवाशांनी हे स्थानक नेहमीच गजबजलेले असते गणेशोत्सवाच्या निमित्ताने चाकरमान्यांची मोठी ये-जा सुरू असते. मात्र, रेल्वेस्थानकातील काही अधिकारी, कर्मचारी स्वतः रेल्वेस्थानकाला लागूनच आपल्या गाड्या पार्क करीत आहेत. यामुळे प्रवाशांची अडचण होत आहे. तसेच, अपंगांसाठी असणाऱ्या रॅम्पलगत चारचाकी गाडी लावण्यात येते. स्थानकाच्या प्रवेशद्वाराजवळ दुचाकी उभ्या केल्या जातात. यामुळे प्रवासी संताप व्यक्त करत आहेत. कोकण रेल्वे अधिकाऱ्यानी याबाबत लक्ष देऊन तातडीने कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## एसटीची मेट्रो पिलरला धडक

**अपघातात ८ जण जखमी**

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

घोडबंदर रोड येथे मागील आठ दिवसांमध्ये तीन अपघात झाले असून वारंवार होणाऱ्या अपघांतामूळे येथील वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. या मार्गे सुरू असलेल्या अवजड वाहतुकीमुळे नागरिकांना वाहने चालवताना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. यातच मंगळवारी (दि.१०) सकाळी याच मार्गावर ओवळा या ठिकाणी एसटी बस मेट्रोच्या पिलरला जाऊन धडकली. या अपघाता आठ प्रवासी जखमी झाले आहेत.

घोडबंदर रोड या ठिकाणी बुधवारी (दि.४) ट्रक अपघातामुळे प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. याचा मोठा फटका विद्यार्थ्यांना बसला होता. यानंतर पुन्हा एक ट्रक अपघात झाला आणि आता मंगळवारी सकाळी देखील एसटीचा अपघात झाला. ही एसटी बस खोपट एसटी डेपोतून अंबेजोगाई ते बोरिवली अशी जात असल्याची माहिती ठाणे आपत्ती विभागाकडून कळविण्यात अली आहे. या अपघातात बस चालक के. अडसूळ (३५) आणि बस वाहक चाटे हे दोघेही जखमी झाले असून प्रवाशांपैकी उद्धव चौरे (६५), उर्मिला चौरे (५५), सलीम शेख (५८), आत्माराम शेजुळ (४९), राजश्री शेजुळ (४२), आकांक्षा शेजुळ (३५) असे एकूण आठ जण जखमी झाले आहेत. जखमींना खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

**अश्मयुगीन कालखंडातील दहा ते बारा हजार वर्षे पुरातन**

# वीरगाव येथे आढळलले कातळशिल्पे

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**



लांजा तालुक्यात एकूण २३ कातळशिल्पे शोधण्यात स्थानिक तरुणांसह अभ्यासकांना यश आलेले आहे. कातळशिल्पे अश्मयुगीन कालखंडातील असून, त्यांच्या अभ्यासाला महत्व आहे. तज्ज्ञांच्या मते हे कातळशिल्पे अश्मयुगीन असून, त्यांचा कालखंड दहा ते बारा हजार वर्षे इतके पुरातन आहे.

वीरगाव येथे पिंपळाची बाऊल येथे एक शिल्प आणि सुकाड येथे २२ शिल्पे विद्यार्थी संशोधक मिलनाथ पालेरे, सुचारिता चौधरी आणि वेदवर्शिनी एस. आर. यांनी बोरगाव येथील योगेश पातेरे, सिद्धेश वीर आणि इतर शालेय विद्यार्थ्यांच्या मदतीने शोधून काढली आहेत. या शिल्पांमध्ये जलचर, भूचर या व्यतिरिक्त पक्षी, मानवाकृती शिल्प, गोपद्य आणि अनाकलनीय चित्रे कोरली गेली आहेत. यामध्ये मुख्यतः मासे, गरुड पक्षी, ससा, कांडेचोर, काळवीट, डुक्कर, मानवाकृती आणि आणखी काही चित्रे कोरलेली आहेत. यात गरुड पक्षी सुमारे अडीच मीटर लांबीचा आहे. यातील मानवाकृती आकृती स्थानिक देवता म्हणून ओळखली जाते. पिंपळाची बाऊलमधील चित्रे सुमारे एक मीटर लांब आणि दीड मीटर रुंदीची आहेत. त्यांचे आकलन अजून झालेले नाही.

> **कोकणातील कातळशिल्पांना राज्य शासनाकडून संरक्षण मिळाले आहे. यामुळे या शिल्पांना पर्यटनदृष्टीने तसेच अभ्यासूदुष्टीने पाहणे अधिक उत्तम होईल आणि त्यांच्या संवर्धनाकडेही लक्ष देता येईल. यामुळे येथील ग्रामीण जीवन विकासाच्या प्रवाहात वेग धरेल आणि विशेष म्हणजे कोकणाच्या प्रागैतिहासिक इतिहासामध्ये मोलाची भर पडेल.**
> **- मिलनाथ पातेरे, अभ्यासक**

### मानवकृती आकृती देवता

**वीरगाव येथील मानवाकृती कातळशिल्पाला स्थानिक देवता म्हणून पाहिले जाते. या संबंधित दोन दंतकथा प्रचलित आहेत. पहिली कथा अशी की, बाजूच्या गावातील स्त्री या ठिकाणाहून जात असताना काही वाटेतील चोरांनी तिची लूटमार केली आणि त्यामध्ये तिचा मृत्यू झाला. दुसऱ्या कथेत तीच स्त्री तिच्या प्रसूतीसमयी तिच्या घरी जाताना या ठिकाणी पुत्र प्रवसली व तिचा मृत्यू झाला. पुढे तिच्या मुलाने हे शिल्प कोरले असल्याचे सांगितले जाते. गावातीललोक येता-जाता दर्शन घेतात आणि तिच्यावर अंजनी झाडाच्या फांद्या तोडून सावली म्हणून ठेवतात. येथील नागरीक आपल्या मूलबाळांसाठी व सुखासाठी करत असल्याचे अभ्यासक पातेरे यांना सांगितले.**

निवडक

## दोन कारमध्ये अपघात

**नवीन पनवेल :** कारचे टायर बदलत असताना पाठीमागून आलेल्या कारने पाठीमागून धडक दिली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिकेत मोरे हे पळस्पे ते जेएनपीटी रोड लेनने जात असताना त्यांची कार खड्ड्यांमध्ये आदळल्याने दोन्ही टायर फुटले. टायर बदलत असताना पाठीमागून आलेल्या कार ठोकर मारून अपघात केला. यात पोलीस शिपाई अनिकेत मोरे हे किरकोळ जखमी झाले.

## मोहपाडा येथे दुचाकीची चोरी

**रसायनी :** गणेश बांगर नावाचा इसम दुचाकी घेऊन फरार झाल्याची घटना घडली. रसायनी पोलीस ठाण्यात बांगर विरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे. गजानन दुतोंडे हे सुरक्षा रक्षक म्हणून नोकरी करत असून ते घरी नसताना गणेश बांगर याने दुतोंडे यांच्या पत्नी आणि मुलाचा विश्वास संपादन केला. दुतोंडेच्या मुलालादेखील दुचाकीवर बसून टीव्ही आणण्यासाठी घेऊन गेला. मोहपाडा येथील कमानीजवळील गल्लीत दुतोंडे यांच्या मुलास उतरवून गणेश बांगर दुचाकी घेऊन निघून गेला.

## अल्पवयीन मुलांचे अपहरण

**नवीन पनवेल :** सायकल दुरुस्तीसाठी जातो असे सांगून बाहेर गेलेल्या दोन अल्पवयीन मुलांचे अपहरण केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अर्जुन आणि अभिमन्यू हे घरामधून सायकल दुरुस्तीसाठी जातो असे सांगून पनवेल परिसरामध्ये निघून गेले. मात्र ते घरी परत न आल्याने कोणीतरी त्यांचे अपहरण केले. यातील अर्जुन याची उंची चार फूट पाच इंच तर अभिमन्यू याची उंची ४ फूट असून तो अंगाने सडपातळ आहे.

## डोळे तपासणी शिबीर

**तळा :** आदर्श सेवा मुंबईकर मंडळ सोनसडे व ग्रामस्थ व महीला मंडळाचे वतीने श्री काळभैरव मंदिर सभागृहात डोळे तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी श्री न्यु ऑप्टिकलचे शंकर जाधव, निकिता तेलंगे व त्याचें सहकारी, गावचे अध्यक्ष देवजी गावडे, सरचिटणीस कृष्णा भोसले, सल्लागार बालोजी वरंडे, लक्ष्मण करकरे, यशवंत शिगवण, मुंबई अध्यक्ष संतोष पवार उपाध्यक्ष नामदेव वनगुळे, सल्लागार मंगेश गावडे आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## गौराईच्या आगमनाने उत्साह

**तळा :** गणपती पाठोपाठ मंगळवारी गौराईचे सुद्धा आगमन झाल्याने महिला वर्गात उत्साहाचे वातावरण पहायला मिळाले. माहेरवाशिणी ज्या दिवसाची वर्षभर आतुरतेने वाट पाहत असतात. गौराईसाठी जागरण आणि दुसऱ्या दिवशी गौराईच्या पूजनाला ओवसा म्हटले जाते. गौराईचे हे सुख सोहळे पार पाडले जातात. यानिमित्ताने महिलांना माहेरी आपल्या मैत्रिणींसोबत गौराईचा सण साजरा करायला मिळत असल्याने उत्साहाचे वातावरण पसरले असल्याचे चित्र पहायला मिळते.

# विद्यार्थी गणवेशापासून वंचित

## बहुजन विद्यार्थी संघटना करणार आंदोलन



। पाली । वार्ताहर ।

महाराष्ट्रातील जिल्हा परिषद व नगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना शासनाकडून दोन गणवेश मोफत दिले जातात परंतु या चालू शैक्षणिक वर्षांमध्ये महाराष्ट्रातील जवळपास अर्ध्या पेक्षा विद्यार्थ्यांना अजूनही गणवेश मिळालेले नसून गणवेशापासून विद्यार्थी वंचित असल्याचा आरोप बहुजन विद्यार्थी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाणी यांनी केला आहे.

महाराष्ट्र राज्यातील सरसकट विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत दोन गणवेश मोफत दिले जातात. महाराष्ट्रातील जिल्हा परिषद आणि नगर परिषदेच्या शाळांतील जवळपास ४४ लाख ६० हजार विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळतो. परंतु अर्धे वर्ष संपायला आले तरीसुद्धा महाराष्ट्रातील अर्ध्याहुन विद्यार्थी गणवेशाविना शाळेत जात आहेत. महाराष्ट्र शासनाने एक राज्य एक गणवेश योजना आणून इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना एक स्काऊट गाईड गणवेश व एक नियमित गणवेश देण्याचे ठरविले. त्यासाठी गुजरातमधील एका कंपनीला कापड खरेदीचा संपूर्ण महाराष्ट्राचा ठेका देऊन गणवेश शिवण्याचे काम महिला आर्थिक विकास महामंडळाला देण्यात आले. परंतु अजून एकच गणवेश अर्ध्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना मिळालाच नाही. दुसरा गणवेश तर अजून ४४ लाख ६० हजार विद्यार्थ्यांना मे महिन्याच्या सुट्टीत मिळतो की काय असा आरोप अनिल वाणी यांनी केला आहे.

यापूर्वी शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यावर शिक्षण विभागाकडून पैसे वर्ग केले जात असत. शाळा व्यवस्थापन समिती नजीकच्या महिला बचत गटाकडून किंवा नजीकच्या व्यापाऱ्याकडून गणवेश खरेदी करीत असत. शाळा सुरू व्हायच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना दोन जोड गणवेश दिले जात होते. परंतु या चालू शैक्षणिक वर्षांमध्ये राज्य सरकारने शाळा व्यवस्थापन समितीचे अधिकार काढून गुजरातमधील एका ठेकेदाराला संपूर्ण महाराष्ट्राचा कपडा पुरविण्याचा ठेका दिल्याने ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या विद्यार्थ्यांना अजूनही गणवेश मिळाले नाहीत.

शाळा सुरू व्हायच्या पहिल्याच दिवशी जिल्हा परिषदेच्या व नगरपरिषदेच्या शाळेच्या विद्यार्थ्यांना गणवेश मिळाला पाहिजे असे शासनाचे धोरण असताना याला मात्र ठेकेदाराने हरताळ फासल्याचे दिसून येत आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाने काही शाळांना गणवेश शिवून दिलेले आहेत, परंतु विद्यार्थ्यांची मापे न घेताच ढोबळपणाने गणवेश शिवले गेले असून बऱ्याच विद्यार्थ्यांना हे गणवेश टाईट होत आहेत त्यामुळे वंचित आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांची चेष्टा करण्याचे काम राज्य सरकार करीत आहे असा आरोप बहुजन विद्यार्थी संघटनेने केला आहे.

येत्या आठ दिवसांमध्ये महाराष्ट्रातील जिल्हा परिषद आणि नगर परिषदेच्या ४४ लाख ६० हजार विद्यार्थ्यांना मोजे आणि बूटासहित दोन जोड गणवेश नाही मिळाले तर बहुजन विद्यार्थी संघटना राज्यभर आंदोलन करेल असा इशारा बहुजन विद्यार्थी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाणी यांनी दिला आहे.

# कर्जतला नागरी समस्यांनी वेढले

## कर्जत संघर्ष समितीकडून आंदोलनाचा इशारा



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत नगरपरिषदेच्या उदासीन कारभाराविरुद्ध गणेशोत्सव नंतर आंदोलन उभे करण्याचा इशारा देण्यात आला आहे. कर्जत संघर्ष समितीचे वतीने ॲड. कैलास मोरे यांनी त्याबाबत माहिती दिली असून कर्जत शहरातील विविध समस्या बाबत आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कर्जत संघर्ष समिती कडून शहरातील नागरी समस्यांबाबत गेली दोनवर्षे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

जनरेटर असताना शहरातील नागरिकांना वेळेवर पाणी मिळत नाही तर ते करोडो रुपयांचे जनरेटर नगरपरिषदेने घेण्याचे कारण काय असा प्रश्न उपस्थित केला आहे. गेल्या अनेक वर्षापासून कर्जत नगरपरिषदेचा भोंगळ कारभार सुरू आहे. अनियमित आणि अशुद्ध पाणी पुरवठा यावर उपाययोजना म्हणजे एक्स्प्रेस फिडर त्याबाबत कर्जत नगरपरिषदेने अद्याप ठोस भूमिका घेतली नाही. महावितरणच्या आंदोलनावेळी हा प्रश्न चर्चेला आला. परंतु त्यावर कर्जत नगरपरिषदेने पुढे काय केले याबाबत खुलासा झालेला नाही. करोडो रूपये खर्च करुन कर्जत नगरपरिषदेने पाणी पुरवठ्यासाठी वंजारवाडी आणि दहिवली हिथे जनरेटर घेतला आहे. परंतु त्याचा वापर होत नसून लाईट नाही या नावाखाली वेळी-अवेळी पाणी पुरवठा होत असतो. त्यामध्ये अनेक भागामध्ये कमीजास्त दाबाने पाणी पुरवठा होतो त्यामुळे नागरिक त्रस्त आहेत. शहरात डासांचे साम्राज्य वाढले आहे. फवारणी होत नाही. कचरा संकलन होत नाही आणि त्यामुळे डासांचे प्रमाण वाढले आहे.

# तिहेरी हत्याकांडामधील आरोपीला फाशी देण्याची नागरिकांची मागणी



। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ कळंब रस्त्यावरील चिकणपाडा गावातील पोशिर पाडा येथे राहणाऱ्या तिघांचा खून करणाऱ्या हनुमंत पाटील यास फाशी देण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांनी निवेदन देवून केली.नेरळ पोलीस ठाणे येथे माले,चिकणपाडा, बोरगाव येथील ग्रामस्थांनी निवेदन देवून ही मागणी केली आहे.

बोरगाव येथील रहिवाशी असलेले मदन पाटील, अनिशा पाटील आणि दहा वर्षाचा मुलगा विवेक पाटील या तिघांचा खून हनुमंत पाटील याने कुऱ्हाडीने केला होता. त्या प्रकरणी पोलिसांनी हनुमंत पाटील यास ताब्यात घेतले असून त्याच्यावर तिघांचा खून केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. त्याने खुनाची कबुली दिल्यानंतर बोरगाव तसेच पोशीर आणि माले या गावातील ग्रामस्थ नेरळ पोलीस ठाण्यात पोहचले.बोरगाव येथील स्थानिक ग्रामस्थ तसेच मामाचे गाव असलेले पोशीर तसेच मदन पाटील यांच्या पत्नीचे माहेर असलेले माले या गावातील रहिवाशी नेरळ पोलीस ठाणे येथे एकत्र आले होते.त्यावेळी या ग्रामस्थांनी नेरळ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे यांना निवेदन सादर केले.त्या निवेदनात आरोपी हनुमंत पाटील यास फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी केली.

# राजेंद्र म्हात्रे यांना मातृशोक

। अलिबाग । प्रतिनिधी ।



अलिबाग तालुक्यातील तळ येथील वंदना वसंत म्हात्रे (७५ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी (दि.१०) निधन झाले. त्यांच्या पश्चात पती वसंत म्हात्रे, पुत्र प्रकाश म्हात्रे, प्रमोद, राजेंद्र आणि कन्या कमल यांच्यासह सूना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते, कावीरचे माजी सरपंच राजेंद्र म्हात्रे यांच्या त्या मातोश्री होतं.

वंदना म्हात्रे यांनी तळ गुलाब महिला मंडळामार्फत गृह उद्योग उभारला. यातून अनेक महिलांना रोजगाराचे साधन खुले करून दिले होते. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्या आजारपणावर उपचार सुरु होते. मंगळवारी त्यांचे अल्पशा आजारामुळे निधन झाले. तळ येथील वैकुंठभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी विविध स्तरातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ, नातेवाईकांनी उपस्थित राहून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. वंदना म्हात्रे यांचे उत्तरकार्य गुरूवारी (दि.१९) तळ येथील निवासस्थानी होणार असल्याची माहिती म्हात्रे कुटुंबियांकडून देण्यात आली.

# गणेशोत्सवामध्ये भाजी खरेदीसाठी गर्दी

## पेण, भाजी मार्केट मध्ये भाज्यांचे दर वाढले; कोथिंबिर १०० जुडी, मटार २५० रुपये किलो

। गडब । वार्ताहर ।

गणेशोत्सवात शाकाहारालाच पंसती असल्याने या कालावधीत जेवणामध्ये भाज्याचाच वापर केला जात आसल्याने भाजी खरेदी करण्यासाठी ग्राहकांनी पेण - वडखळ बाजारात भाजी खरेदीसाठी गर्दी होत आहे तर स्थानिक भाजीलाच जास्त मागणी आसल्याचे दिसत आहे. तर भाज्याचे दर किलोमागे ३० ते ४९ रुपयांने वाढले आहेत. तर कोथिंबिर जुडी १०० रुपये दराने विकली जात आहे.

भाज्याचे मागील महिन्यात जे दर होते त्यापेक्षा ३० ते ४० रुपयांनी वाढले असले तरी ग्राहक मोठ्या प्रमाणात भाजी खरेदी करत असुन भाजी खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी होत आहे. विशेष करुन पेण येथील कृषी उत्पन्न समितीच्या भाजी मंडईत भाजी खरेदीसाठी ग्राहक गर्दी करत आहेत. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भाज्यांची खरेदी विक्री होत आहे.

तर आता बाजारात वांगी ६० रुपये किलो, भेंडी ६०रुपये किलो, टॉमेटो ५० रुपये किलो , मटार २५० रुपये किलो मिरची ६० रुपये किलो, गवार ५० रुपये किलो, फरसबी ६० रुपये किलो, फ्लॉवर ८० किलो, कोबी ३० किलो, शिमला मिरची६० किलो गाजर ६०किलो, बीट ६० किलो,शेवग्याच्या शेंगा ५० किलो रुपये दराने विक्री होत होत आहे. कोथीबिर १०० रुपये जुडी, मेथी २० ते ३० रुपये जुडी पेण परिसरात भेंडी, शिराळा, कारली, काकडी व पालेभाज्याची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते या भाज्याना मागणी वाढली आहे. तरी या भाज्यामध्ये वांगी, टॉमेटो, मिरची, कोथिंबिर या भाज्यांची आवश्यकता आसल्याने आसल्याने दर वाढले असले तरी भाज्या खरेदी कराव्याच लागतात. गणेशोत्सवात पूजा, व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन होत आसल्याने जेवणामध्ये भाज्याचाच वापर होत आसल्याने भाजी खरेदी मोठ्या प्रमाणात होत आहे

# चलचित्र, देखाव्यातून स्वच्छतेचा संदेश

## दिवीपारंगीमधील मिलींद घरत यांचे होतेय कौतुक



। अलिबाग । प्रतिनिधी ।

नागरिकांपर्यंत स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी तालुक्यातील दिवीपारंगीमधील मिलींद घरत यांनी त्यांच्या घरी चलचित्र व देखाव्यातून स्वच्छतेचा संदेश पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे. स्वच्छ सर्वेक्षण २०२४ स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियान या चलचित्रात देशातील सर्व गावे व शहरे हागणदारीमुक्त व्हावे,त्यासाठी शौचालय बांधणे, त्याचा वापर करणे यावर विशेष जनजागृती व देखावा सादर केला आहे. त्यांच्या या अभिनव उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतूक करण्यात येत आहे.

जिल्ह्यात घरोघरी बाप्पाचे आगमन सात सप्टेंबरला झाले. बाप्पाच्या स्वागतासाठी अनेकांनी वेगवेगळ्या प्रकारच्या आकर्षक आरस तयार केल्या आहेत. त्यात काहींनी गणरायाच्या मूर्तीसमोर समाजहिताच्या दृष्टीने चलचित्र, देखावे तयार केले आहेत.

ग्रामीण भागासह शहरी भागातील सार्वजनिक ठिकाणांच्या भिंतीवर आकर्षक भित्तीचित्रे काढण्याचा देखावा त्यांनी सादर केला आहे. माझी वसुंधरा अभियानांतर्गत कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी घरातील उरलेले खाद्य पदार्थ, खरकटे अन्न, ओला कचरा व शेणापासून बायोगॅस व कंपोस्ट खत तयार करण्याचा देखावा त्यांनी तयार केला आहे. पावसाचे प्रमाण वाढविण्यासाठी वृक्षारोपण काळाची गरज आहे. वृक्षारोपणाची जनजागृती करण्यासाठी वृक्षारोपणाचा देखावा सादर करून वसुंधरेचे संवर्धन करण्याचा संदेश त्यांनी दिला आहे. देशातील व महाराष्ट्रातील बऱ्याचशा ग्रामपंचायतींमध्ये कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी घंटागाडीची व्यवस्था करावी अशी विनंती केंद्र व राज्य सरकारला देखाव्यातून केली आहे. अभियानांतर्गत ज्याप्रमाणे मोठ्या शहरांमध्ये स्वच्छतेसंदर्भात स्पर्धा भरविल्या जातात. त्याप्रमाणे ग्रामपंचायतस्तरावर स्वच्छतेसंदर्भात स्पर्धा घेण्यात याव्यात. त्यामुळे गावातील रस्ते विकसित होतील, भिंती स्वच्छ रंगरंगोटीने रंगतील, गाव स्वच्छ झाला तर देश स्वच्छ होईल लोकांचे आरोग्य निरोगी होईल, रोगराई नष्ट होईल स्वच्छ भारत अभियान यशस्वी होईल अशा अनेक प्रकारचे स्वच्छतेचे महत्व या देखाव्यांमधून त्यांनी दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. वाढत्या प्रदुषणामुळे मानवी आरोग्य धोक्यात आले आहे. वेगवेगळ्या आजाराला माणूस बळी पडत आहे. मानवी आरोग्य चांगले राहवे यासाठी स्वच्छता ही महत्वाची आहे. घराबरोबरच आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे ही काळाची गरज आहे, हे मिलींद घरत यांनी चलचित्रातून दाखवून दिले आहे. या देखाव्याबाबत कौतुक करण्यात येत आहे.

# अध्यक्षपदी डॉ.घनशाम पाटील यांची नियुक्ती

**उरण:** उरण तालुक्यातील उरण मेडिकल वेलफेअर असोसिशन ही डॉक्टर संघटना असून, या संघटनेची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये अध्यक्ष डॉ.घनशाम पाटील तर सचिवपदी डॉ. सत्या ठाकरे यांची निवड करण्यात आली. तर इतर कार्यकारिणीसुद्धा पदग्रहण सोहळ्यादरम्यान जाहीर करण्यात आली आहे.

उरण मेडिकल असोसिशन या डॉक्टर संघटनेच्या नव्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली होती. यानंतर या कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा उरणमधील भोईर गार्डन येथे आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम संघटनेचे मार्गदर्शक डॉ. दहिफळे, डॉ.सुरेश पाटील, डॉ.मंगेश डाके, डॉ.विकास मोरे यांच्या उपस्थितीमध्ये पार पडला. यावेळी जुन्या कार्यकारिणी सदस्यांना सन्मानित करून, नव्या कार्यकरिणीचे स्वागत करण्यात आले. अध्यक्षपदी डॉ.घनशाम पाटील, सचिव डॉ. सत्या ठाकरे, खजिनदार डॉ.सचिन गावंड, क्रीडा सचिव डॉ.अतुल बोन्द्रे, क्रीडा उप सचिव डॉ.रोशन पाटील, सांस्कृतिक सचिव डॉ. राजन म्हात्रे, उप सांस्कृतिक सचिव डॉ.शुभांगी मोकल, सीएमई सचिव डॉ.कृष्णा बोरकर, उप सीएमई सचिव डॉ. अनिकेत पाटील यांची निवड नव्या कार्यकारिणीमध्ये करण्यात आली आहे. डॉ.सत्या ठाकरे यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवत संघटनेने सलग तिसऱ्यांदा सचिवपदी निवड केली आहे. पदग्रहण सोहळ्या दरम्यान मावळतीचे अध्यक्ष डॉ. विकास मोरे यांनी आपल्या कार्यकाळातील अनुभव व्यक्त केले.


## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबाग एस.टी.स्टॅन्ड समोर 'अलिबाग प्राईड' येथे पहिला माळा, 'रोड फेसिंग' सेमी कमर्शिअल फ्लॅट भाडेतत्वावर देणे/विकणे आहे. Area1000 sq.ft (2BHK Flat) Contact : 9579548535 (स.९ ते सं.६)
- दुकान भाड्याने मिळेल बेवुड, गोंधळपाडा अलिबाग ९४२३३७५१९८/८४११०१६४४४
- नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफ (वेटर/हाऊसकिपींग)ची आवश्यकता आहे. एक ते दोन वर्ष अनुभव असणाऱ्यांनी रोहन ठाकूर यांना ९९२१०७४०४२ या नंबरवर संपर्क साधावा.
- घरात घरकाम व मुलाची देखभाल करण्यासाठी केअर टेकर पाहिजे आहे. ठिकाण नागाव. कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ , पगार १००००. संपर्क- ७८७५८५६५५५.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१





# पंढरीनाथ मालुसरे यांचा सन्मान

**। पोलादपूर । वार्ताहर ।**

साखर गावातील देशसेवेतून निवृत्त सैनिक पंढरीनाथ मालुसरे यांची साखर ग्रामस्थांकडून पितळवाडी फाट्यापासून मिरवणूक अन् साखर गावी सत्कार करण्यात आला. बेळगाव येथे ६ मराठा लाईट इन्फ्रंट्रीमध्ये भारतीय सैन्यदलात भरती होऊन २२ वर्षांनंतर सेवानिवृत्त होऊन सैनिक पंढरीनाथ मालुसरे हे सहकुटूंब सहपरिवार गावी परतल्यानंतर साखर गावाने तालुक्यात प्रथमच अन्य जवानांच्या गावातील ग्रामस्थांनी आदर्श घ्यावा असा प्रघात निर्माण केला आहे.



यावेळी पितळवाडी नाक्यावर चालक मालक संघटनेच्यावतीने सेवानिवृत्त सैनिक पंढरीनाथ मालुसरे यांचे भव्य स्वागत लक्ष्मण खेडेकर, भगवान साळवी, सचिन खेडेकर, शिवाजी मालुसरे, श्याम वरणकर, ज्ञानोबा कुंभार, स्वप्नील कुंभार, संदीप वरणकर, पंढरीनाथ जाधव, तुकाराम गायकवाड, विलास जाधव, लक्ष्मण केसरकर, मिलींद मालुसरे, राजू गायकवाड, विनायक केसरकर, दिपक पार्टे, संजय चोरगे, संतोष खेडेकर, भाऊ तुडीलकर आदींच्या उपस्थित करण्यात आले.

या मिरवणुकीदरम्यान महाडच्या माजी नगराध्यक्ष स्नेहल माणिकराव जगताप कामत यांनी सेवानिवृत्त सैनिक पंढरीनाथ मालुसरे यांना शुभेच्छा दिल्या.

प्रस्तावनेमध्ये शिवसेना तालुकाप्रमुख अनिल मालुसरे यांनी शिवछत्रपतींच्या हिंदवी स्वराज्यासाठी प्राणाची बाजी लावणाऱ्या नरवीर सुर्याजी मालुसरे आणि नरवीर सुभेदार तानाजी मालुसरे यांचा लढाऊ वारसा सांगणाऱ्या देशसेवेतून निवृत्त सैनिक पंढरीनाथ मालुसरे यांनी बेळगाव, जम्मू काश्मीर- सांबा, नॉर्थ इस्ट सिक्कीम, पुणे, जम्मू काश्मीर- आखनूर, पश्चिम बंगाल, न्यू दिल्ली, मध्यप्रदेश, साऊथ सुदान, खंजळवान गुरेज सेक्शन, पठाणकोट येथे डयुटी बजावली. सांबा येथे २००४, नार्थ सिक्कीम बंकर येथे २००६, नॉर्थ इस्ट सिक्कीम लांचूग २००७, जम्मू काश्मीर आखनूर येथे २०१२, युनायटेड नेशन्स दक्षिण आफ्रिका येथे साऊथ सुदान येथे २०१७, जम्मू काश्मीर खंजळवान गुरेज सेक्शन २०१९ या ठिकाणी विविध कालावधीत भारतीय सैन्यदलाच्या विविध ऑपरेशन्समध्ये महत्वाची कामगिरी बजावण्याची संधी मिळाली.

## पोलीस ठाण्यात शिरला अजगर

**नवीन पनवेल** : सीबीडी पोलीस ठाणे येथील अंमलदार कक्षामध्ये टेबल खाली असलेल्या अजगराला पकडून सर्पमित्र स्वप्नील साटम यांनी सुरक्षितरित्या नैसर्गिक अधिवासात सोडले.

पोलीस ठाण्यात अजगर शिरल्याचे समजताच स्वप्नील साटम यांनी क्षणाचा ही विलंब न करता उलवे येथून सीबीडी पोलीस स्टेशन गाठले. सर्व स्टाफ भीतीने कक्षाच्या बाहेर उभा होता. स्वप्नीलने त्वरित बचाव कार्य सुरु करत पाहणी केली असता त्याला अजगर दिसून आला. भला मोठा अजगर जातीचा साप संगणक टेबल खाली लपून बसला होता. यावेळी अजगराच्या फुत्कारण्याचा आवाज सर्वत्र स्पष्ट ऐकू येत होता. त्यामुळे पोलीस ठाण्यातील अधिकारी, अंमलदार व महिला कर्मचारी यांच्यात भीतीचे वातावरण तयार झाले झाले होते. स्वप्नील यांनी क्षणाचा विलंब न करता सापाला सुरक्षितरित्या पकडले.त्यानंतर स्वप्नील यांनी सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सापाविषयी माहिती देत त्याच्या मनातील भीती दूर केली. एवढ्या रात्रीदेखील वेळेवर येऊन अजगराला पकडल्यामुळे पोलीस अधिकारी व पोलीस दलाने स्वप्नीलचे कौतुक केले.

## जैन धर्मियांच्या पर्युषण पर्वाची सांगता

**। कर्जत । वार्ताहर ।**

कर्जतमध्ये जैन धर्मियांच्या पर्युषण पर्वाची उत्साहात सांगता झाली. या निमित्ताने कर्जत शहरातील जैन बांधवांनी भगवान महावीरांच्या मूर्तीची कर्जत शहरातून मिरवणूक काढली व जैन मंदिरात मिरवणुकीची सांगता करण्यात आली. या प्रसंगी मोठ्या संख्येने जैन बांधव व भगिनी उपस्थित होत्या. जैन मुनी दिव्यरत्न महाराज, चित्तरत्न महाराज, जशरत्न महाराज, हेत्तरत्न महाराज, निप्पारत्न महाराज यांच्या सह सतरा जैन मुनी व जैन साध्वी यांच्या नेतृत्वाखाली मिरवणूक काढण्यात आली. सदर मिरवणूक ही जैन मंदिर पासून सुरू होऊन रेल्वे स्टेशन व पोस्ट जवळून आंबेडकर पुतळा जवळ मस्जिद ते जैन मंदिर अशी काढण्यात आली. याप्रसंगी अजित ओसवाल, रमेश ओसवाल, संजय ओसवाल, अशोक ओसवाल, मोहन ओसवाल, भरत सोलंकी, विजय परमार आदी उपस्थित होते.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड**

**दरपत्रक मागणी सुचना क्र. ०२ सन २०२४-२५**

| १/- अ.क्र. | कामाचे नावं |
|---|---|
| 1. | कर्जत उप विभागीय कार्यालयातील अभिलेखाच्या संस्करणासाठी यंत्रसामुग्री कार्यान्वित करणे. |
| 2. | तळा तहसील कार्यालयातील अभिलेखाच्या संस्करणासाठी यंत्रसामुग्री कार्यान्वित करणे. |
| 3. | मुरुड तहसील कार्यालयातील अभिलेखाच्या संस्करणासाठी यंत्रसामुग्री कार्यान्वित करणे. |
| 4. | श्रीवर्धन तहसील कार्यालयातील अभिलेखाच्या संस्करणासाठी यंत्रसामुग्री कार्यान्वित करणे. |
| 5. | कर्जत तहसील कार्यालयातील अभिलेखाच्या संस्करणासाठी यंत्रसामुग्री कार्यान्वित करणे. |
| 6. | माणगाव तहसील कार्यालयातील अभिलेखाच्या संस्करणासाठी यंत्रसामुग्री कार्यान्वित करणे. |

वरील कामांचे अंदाजपत्रक तयार करणेकामी दरपत्रके मागविण्यात येत आहे.

२/- इच्छुक पुरवठादारांना वरील कामाची माहिती, कामाची व्याप्ती, तांत्रिक तपशील व अटी व शर्ती, दरपत्रके कार्यक्रमाच्या तारखा इत्यादी बाबतचा तपशील जिल्हाधिकारी कार्यालय रायगड च्या नोटीस बोर्डवर दिनांक १०/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजले पासून उपलब्ध होऊ शकेल.

जा.क्र.साशा/कार्या-१/ब-४/अंदाजपत्रक/२०२४
दिनांक — १०/०९/२०२४

**(किशन ना. जावळे)**
**जिल्हाधिकारी रायगड.**

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या निर्देशांतर्गत आम्ही खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत जमिनीसंदर्भात जय अंबे लँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : डी-२२/१, एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, तुर्भे, नवी मुंबई -४०० ७०५ यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत.

कोणाही व्यक्तीचा खालील निर्देशित मालमत्ता वा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणताही करार, विक्री, हस्तांतरण, गहाण, प्रभार, धारणाधिकार, भार, भेट, विमोचन, विनिमय, सुविधाधिकार, हक्क, निषेधाज्ञा व स्थिती, वहिवाट, अभिहस्तांकन, भाडेकरार, उप-भाडेकरार, लिव्ह अॅन्ड लायसेन्स, वापर, विकास करार, संयुक्त उद्यम, ताबा, विभाजन, न्यास, उत्तराधिकार, थकित कर व /वा दंड, देणी व देखभाल, जप्ती, विचाराधीन विवाद व/वा मूळ हक्क दस्तावेजांच्या त्यांच्या ताब्यात असण्यासंदर्भात वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा, हक्क, अधिकार व/वा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंदर्भात अधोहस्ताक्षरितांना लिखित स्वरूपात कागदोपत्री पुराव्यांच्या प्रमाणित सत्यापित प्रतींसमवेत त्यांचे कार्यालय पत्ता २ रा मजला, भाग्योदय बिल्डिंग, ७९, नगीनदास मास्तर रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३ येथे सदर तारखेपासून चौदा (१४) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा अशा दाव्यांच्या कोणत्याही संदर्भाविना चौकशी पूर्ण करण्यात येईल व असे दावे अधित्यागित समजण्यात येतील.

**वरील संदर्भित अनुसूची**

पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गाव वानवे, तालुकाखालापूर, जिल्हा रायगड, नोंदणीकरण जिल्हा व उपजिल्हा खालापूर, महाराष्ट्र येथील, खालील निर्देशित गट क्रमांक अनुसार :

| अ. क्र. | गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (एच-आर-ए) |
|---|---|---|---|
| १. | १८ | २ए | ०६-२५-०० |
| २. | ४६ | २ | ०-२९-४० |
| ३. | १४ | ३ | ०-३९-३० |

**मे. मार्कंड गांधी अॅन्ड कं. करिता**
**सत्येन वोरा**
**भागीदार**
दिनांक : ११ सप्टेंबर, २०२४ **वकील व सॉलिसिटर्स**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे नडोदे ता. खालापुर जि. रायगड येथील हक्नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. नडोदे ता. खालापुर जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | गट नं | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| बाळाराम आनंदराव विचारे | २२ | | एकुण क्षेत्र २- ७९-०० पोट खराब ०-९२-०० यापैकी विक्री करणार यांचे मालकीचे क्षेत्र २-३९-०० | १-२४ |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी चार्ज बक्षिस वहीवाट इजमेंट बोजा तारण वारसा ट्रस्ट कुळहक्क अथवा अन्य तारण,वारसा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद अॅडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३ (तिन) दिवसाचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणा-या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.१२/०९/२०२४
मो.नं.८००७५३७६५६

खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट.
**अॅड. महेश कमलाकर थोरवे**
रा. कर्जत ता. कर्जत जि.रायगड

## PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to the public at large that our clients i) Rajendra Anant Shirgaonkar, ii) Sudhir Anant Shirgaonkar, iii) Balwant Anant Shirgaonkar, iv) Dhananjay Anant Shirgaonkar, v) Devyani Devendra Sardal and vi) Tejas Sunil Pednekar have informed us that they are the sole, absolute and lawful owners of the land more particularly described in the Schedule hereunder written ("Property").

We have also been informed by our clients that the original title document viz. Sale Deed dated 26/03/1966 registered with the office of Sub-Registrar of Assurances - Alibag under Registration No. 228 of 1966 ("Document") pertaining to the Property has been misplaced and/or lost and the same is not traceable in spite of diligent search by our clients. Our clients have also informed us that they have not deposited the Document with any person/financial institution/bank as security or otherwise. All or any person claiming to be in possession of the original Document or otherwise having any right, title, interest, claim, demand and/or objections against/upon/in respect of/to the Property by way of sale, exchange, lease, tenancy, license, trust, lien, maintenance, inheritance, bequest, succession, possession, hypothecation, easement, right, covenant or condition, attachment, encumbrance, mortgage (equitable or otherwise), charge, gift, partnership, family arrangement/settlement, or other dispositions or under any lis-pendens, injunction, attachment, decree or order or award passed by any court of law or tribunal or revenue or statutory authority or otherwise of any nature whatsoever and in howsoever manner is hereby requested to give written notice of the same to Zunjarrao & Co, 4th Floor, Jalaram Jyot Building, Janmabhoomi Marg, Fort, Mumbai - 400001, along with certified true copies of documents in support of such right, title, interest, claim, demand and/or objections within 7 (seven) days from the date of publication of this notice, failing which, it shall be presumed that no such claim, demand or objection exists and even if such claim, demand or objection exists in law or otherwise, it shall be deemed that the claimant has relinquished such claim, demand or objection and has waived any right to exercise such claim, demand or objection and any such claim or objection shall not be binding on our clients.

**THE SCHEDULE**
**(Description of Property)**

All that piece and parcel of agricultural land bearing Gat No. 158 admeasuring 00.62.70 (H.A.Sq.Mts.) situated at Village - Zirad, Taluka - Alibag, District - Raigad and bounded as follows:
On or towards North : By land bearing Gat Nos. 157 & 159
On or towards South : By land bearing Gat No.156
On or towards East : By land bearing Gat Nos. 152 & 159
On or towards West : By land bearing Gat No. 156
Dated: 12th day of September, 2024

Zunjarrao & Co.
Sd/-
Vikrant Zunjarrao

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येत की आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत ही ९९ वर्षाच्या भाडेकराराने विकत घेतलेली आहे तिचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - शिलारवाडी, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड**

| जमिन मालकाचे नाव | स.न. | हि.न | क्षेत्र हे.आर.प्रति | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| बबन महादू भगत | ६ | ५ | ०१-६९-०० पो. ख ०-३१-०० | १=३१ |
| | | | एकूण क्षेत्र ०२ -००-०० हे. आर. प्रति | |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही आमचे अशिल श्री संजय मोहनलाल शहारा - ६०२, मेहुल अर्पाटमेंट, राम नगर जैन मंदिराजवळ, बोरीवली (पश्चिम) यांनी दिनांक २५/०६/२०१९ रोजी ९९ वर्षाचे भाडेपट्टा कराराने विकत घेतलेली आहे त्या सोबत नोटरी साठेकरार आणि नोटरी कुलअख्यत्यार पत्र सुध्दा करून घेतलेले आहे. सध्या परिस्थतीत वर वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिलाच्या ताबे कब्जावहीवाटीत आहे त्यामुळे सदर मिळकत आमचे अशिलाच्या परवानगी शिवाय इतर त्रयस्थ अन्य व्यक्ती यांनी कुणीही खरेदी करू नये.

ता. ११/०९/२०२४

सही
**अॅड सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी) मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्ता-नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत - रायगड मो. न. ९८८११३२२४८

**सार्वजनिक वाचनालय आणि जिल्हा ग्रंथालय, अलिबाग-रायगड**
**वार्षिक अहवाल २०२३-२०२४**
**वार्षिक सर्वसाधारण सभेचा अजंडा**
**(फक्त सभासदांसाठी)**

स.न.वि.वि

सार्वजनिक वाचनालय आणि जिल्हा ग्रंथालय, अलिबाग-रायगड या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवार दि.२६/०९/२०२४ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता डोंगरे हॉल अलिबाग येथे भरविण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी या सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज**

१.मागील सभेचे इतिवृत्त वाचून त्यास मंजूरी देणे.
२.सन २०२३-२०२४ चे हिशोब तपासनीसांकडून आलेले हिशोब, ताळेबंद मंजूर करणे.
३.कार्यकारी मंडळाने सादर केलेल्या सन २०२३-२०२४ च्या अहवालास मंजूरी देणे.
४.संस्थेच्या सन २०२४-२०२५ च्या वार्षिक अंदाज पत्रकास मंजूरी देणे
५.सन २०२४-२०२५ या सालाकरीता संस्थेच्या हिशोब तपासनीसांची नेमणूक करणे.
६.मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळच्या कामांचा विचार करणे.

अलिबाग
दिनांक : १०/०९/२०२४

आपला
**अॅड.श्री.गौतम प्रमोद पाटील**
**अध्यक्ष**
**सार्वजनिक वाचनालय, अलिबाग**

**विशेष सूचनाः**
१.संस्थेच्या हितास अधिन राहून अहवाल काळातील आवश्यक ती कागदपत्रे सभेपूर्वी तीन दिवस अगोदर कार्यालयीन वेळेत सायंकाळी ६.०० ते ७.०० या कालावधीत लेखी मागणी केल्यास पहावयास मिळतील.
२.सदर सभा गणपूर्ती अभावी तहकूब झाल्यास ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. या सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही.

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे ''मालमत्ता'' असे उल्लेखित ) संदर्भामध्ये आमचे अशिल १) राजेंद्र अनंत शिरगांवकर, २) सुधीर अनंत शिरगांवकर, ३) बळवंत अनंत शिरगांवकर, ४) धनंजय अनंत शिरगांवकर, ५) देवयानी देवेंद्र सार्दळ आणि ६) तेजस सुनील पेडणेकर (''मालक'') यांनी आम्हाला कळवले आहे की ते सदर मालमत्तेचे एकमात्र, पूर्ण आणि कायदेशीर मालक आहेत.

आम्हाला आमच्या अशिलांनी असे देखील सूचित केले आहे की सदर मालमत्तेशी संबंधित दिनांक २६/०३/१९६६ रोजीचा मूळ शीर्षक दस्तऐवज जे दुय्यम निबंधक-अलिबाग यांच्या कार्यालयात वर्ष १९६६ चा नोंदणी क्रमांक २२८ या क्रमांकास नोंदवलेले आहे (''दस्तऐवज'') ते गहाळ झाले आहे आणि आमच्या अशिलांनी परिश्रमपूर्वक शोध घेऊनही ते सापडत नाही आहे. आमच्या अशिलांनी आम्हाला असेही कळवले आहे की त्यांनी सदर दस्तऐवज कोणत्याही व्यक्ती/वित्तीय संस्था/बँकेकडे गहाण ठेवलेले नाही किंवा/अन्यथा जमा केलेले नाही.

मूळ दस्तऐवज ताब्यात असल्याचा दावा करणारी सर्व किंवा कोणतीही व्यक्ती किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, ट्रस्ट, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, मृत्युपत्र, उत्तराधिकार, ताबा, गृहीतक, वहिवाट, हक्क, करार किंवा अट, संलग्नक, भार, गहाण (न्याययोग्य किंवा अन्यथा), बोजा, बक्षीस, भागीदारी, कुटुंब व्यवस्था/सेटलमेंट, किंवा इतर प्रवृत्ती किंवा कोणत्याही कायद्याच्या कोर्टाने किंवा न्यायाधिकरणाने किंवा महसूल किंवा वैधानिक प्राधिकाऱ्याने किंवा अन्यथा कोणत्याही स्वरूपाचे, आदेश, संलग्नक, हुकूम किंवा निवाडा असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि /किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड, यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - झिराड, तालुका -अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग १५८, एकूण क्षेत्र ००.६२.७० ( है.आर.चौ.मी.) आकार ०४ रु.३० पै. धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग आणि खालील प्रमाणे सीमाबद्धः
उत्तरेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग १५७ आणि १५९
दक्षिणेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग १५६
पूर्वेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग १५२ आणि १५९
पश्चिमेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग १५६
ठिकाण: अलिबाग
दिनांक : १२/०९/२०२४

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

**प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण**
**रॉयल ग्रॅन्डीअर बिल्डींग, पहिला मजला, रामवाडी, पेण जि. रायगड- ४०२१०७**
E-Mail : poitdp.pen-mh@gov.in

दुरध्वनी क्रमांक ०२१४३-२५२५१९ फॅक्स ०२१४३-२५४५६९

## जाहिरात

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण जि.रायगड यांच्या अधिनस्त असलेल्या रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सर्व तालुक्यात सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजनेअंतर्गत क- गटामध्ये खालील प्रमाणे योजना राबविण्यात येणार आहेत. सदर योजनेकरीता इच्छुक स्वयंसेवी संस्था यांनी खालील अटी व शर्तीच्या आधिन राहुन विहीत नमुन्यात व मुदतीत प्रस्ताव सादर करावेत.

| अ. क्र. | योजनेचे नाव | योजनेचा गट | योजनेमधील लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | आदिवासी महिलांना व्यवसायाकरीता व्यवसाहिक अंडयांवरील व मांसल देशी कुकुट पक्ष्यांचे बॅक यार्ड फॉर्म्स आवश्यक ते प्रशिक्षण देऊन स्थापन करणे | क- गट | १० |
| २ | शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना आत्मसंरक्षाकरिता मार्शल आर्ट (कराटे प्रशिक्षण) देणे. | क- गट | २०० |
| ३ | शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना विज्ञान व इतर विषय नाविन्यपुर्ण (विविध मॉडेल द्वारे) पध्दतीने आकलन करणे व त्या विषयाची उत्सकता वाढविणे यासाठी प्रशिक्षण देणे. | क- गट | |

**उपरोक्त योजनेकरीता इच्छुक स्वंयसेवी संस्थांनी खालील अटी व शर्तीनुसार परिपुर्ण कागदपत्रासह विहीत नमुन्यात व विहीत मुदतीत अर्ज सादर करावेत.**

१. संस्था ०३ वर्षापासुन नोंदणीकृत असावी, त्याबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र जोडावे. प्रशिक्षण राबविण्याचा संस्थेचा ०३ वर्षाचा अनुभव असावा त्यासाठी संस्थेकडे आवश्यक प्रशिक्षित मनुष्यबळ व मुलभुत सुविधा असाव्यात.
२. संस्थेच्या विश्वस्तांची/ सदस्यांची यादी सोबत जोडावी. तसेच संस्थेच्या घटनेची प्रत (बायोलॉज) प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.
३. संस्थेचे ०३ वर्षाचे लेखापरिक्षण झालेले असावे व संस्था आर्थिक दृष्ट्या सक्षम असावी.
४. संस्थेने प्रति विद्यार्थी/लाभार्थी अपेक्षित खर्च (प्रशिक्षणासह) बंद लिफाप्यामध्ये सादर करावा. (अ.क्र. २ व ३ साठी लागु)
५. संस्थेकडे रुपये ५.०० लक्ष राष्ट्रीयकृत बँकेची सॉल्वन्सी असणे आवश्यक आहे.
६. संस्थेस अटी व शर्ती मंजुर असल्याचे, काळया यादीत समाविष्ट नसल्याचे व संस्थेच्या कोणत्याही सदस्यावर अध्यक्ष किंवा सदस्यांवर अध्यक्ष किंवा सदस्यांवर कोणत्याही प्रकारचे फोजदारी गुन्हा दाखल नसल्याबाबत रु.१०० च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.
७. संस्था रोजगार व संयरोजगार उपलब्ध करुन देण्यास सक्षम असावी.
८. संस्थेमार्फत ज्या योजनेकरीता प्रस्ताव सादर केला जात आहे सदर योजना किंवा अन्य विविध योजना इतर ठिकाणी राबविलेली आहे का? राबविली असल्यास सदर योजनेचे अभिप्राय किंवा यशोगाथा फोटोसह प्रस्तावासोबत सादर करावेत.
९. महाराष्ट्र राज्यातील कोणतीही इच्छुक संस्था सदर योजनेकरीता प्रस्ताव सादर करु शकेल.
१०. वरील प्रमाणे कागदपत्र बंद लिफाप्यात सादर करण्यात यावेत.

**प्रस्ताव सादर करण्याचा कालावधी :-**

वरील योजनेकरीता इच्छुक संस्थांनी दिनांक १७/०९/२०२४ पासुन ते ०२/१०/२०२४ या कालावधीत उपरोक्त प्रमाणे परिपुर्ण कागदपत्रासह प्रस्ताव या कार्यालयात हस्तपोहच सादर करावेत.

Note :- वरील अमलबजावणी करण्याचे किंवा त्यामध्ये काही बदल करण्याचे किंवा प्रस्ताव रद्द करण्याचे सर्व अधिकार हे प्रकल्प अधिकारी. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण जि. रायगड यांनी राखुन ठेवले आहेत.

**अधिक माहितीसाठी संपर्क : ०२१४३-२५२५१९**

सही/-
**(शशिकला अहिरराव)**
**प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प**
**पेण जि.रायगड**

**विमाका/कोवि/२०२४-२०२५/४६**

# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२४



● सौ. अंकिता सचिन माळी तुडाळ याचे निवासस्थानी श्री गणेशाची आकर्षक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● नागाव नवापाडा श्री. विनोद हरिश्चंद्र थेवडे यांचे निवासस्थानी श्री. गणराय. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● मारुती गोविंद खंडागळे व खंडागळे परिवार डाऊर नगर, उरण यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले गणराज. (छायाचित्र : दिनेश पवार, उरण)



● पुजा प्रकाश मोहिते दादारपाडा, तालुका उरण. (छाया : दिनेश पवार, उरण)



● श्री. नितीन हिलम, चोरोंडे आदिवासी वाडी, ता.अलिबाग यांच्या घरी विराजमान गणपती. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)



● श्री. अनिल जाधव, मु. मुशेत, ता. अलिबाग यांच्या घरी विराजमान गणपती. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)




● श्री. चंद्रशेखर पाशीलकर, मु. तळवडे, पो. कामार्ले, अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणराज. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)



● उद्योजक श्री. अमित मोरे, मु. चोंढी-अलिबाग हे सहकुटुंब सरपंच पिंट्या गायकवाड यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. नारायण पाटील, सौ. नयना नारायण पाटील उरण शहर शेकाप महिला आघाडी अध्यक्ष व पाटील परिवार बाजारपूर तालुका उरण.



● मिलिंद परशुराम घरत मु. दिवीपारंगी, ता. अलिबाग. चलचित्र देखावा-स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियान २०२४. (छायाचित्र- समीर मालोदे)



● श्री. प्रकाश दादा ठाकूर झिराड येथे श्री गणरायाची सुबक सुंदर मूर्ती. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● श्री संग्रह महेंद्र घरत चौल, यांचे निवासस्थानी श्री गणरायाची मंगलमय सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● मुरुड डोंगरी येथील अजिंक्य शेळके यांच्या आईचे घर निवासस्थानी विराजमान झालेली श्री गणेश मूर्ती. (छायाचित्र- सौरभ नाझरे)



● कु. स्वरा राजेंद्र जोशी, रामवाडी, ता. पेण, जि.रायगड.



● स्वरा, पुर्वा, कस्तुरी, काव्य व सार्थक म्हात्रे यांच्या चिरनेर कातळपाडा येथील निवासस्थानी प्रतिष्ठापना करण्यात आलेली, ही गणरायाची सुंदर सुबक शाडु मातीची मुर्ती व आकर्षक सजावट. (छायाचित्र- कस्तुरी म्हात्रे)



● राजेंद्र संतोष धोंड मु.पो. काशिद, ता. मुरुड-रायगड. (छायाचित्र- मेघराज जाधव)



● श्री. शाम नारायण पाटील, मु. सहाण-अलिबाग, से.नि. पीएसआय यांचे निवासस्थानी विराजमान झालेले गणराय.



● नागोठण्यातील सामाजिक कार्यकर्ते राजू कारखानीस यांच्या निवासस्थानी विराजमान बाप्पांचे दर्शन घेताना शिवसेना जिल्हा सहसंपर्कप्रमुख किशोर जैन. सोबत कारखानीस कुटुंबीय. (छायाचित्र : महेश पवार)

# पॅरिसमध्ये भारताने रचला इतिहास

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ मध्ये भारताने इतिहास रचला आहे. पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेमध्ये ८४ पॅरा खेळाडू भारताकडून सहभागी झाले होते. यावेळी भारताने एकूण २९ पदकं जिंकली आहेत. पॅरालिम्पिक स्पर्धेच्या इतिहासात भारताने जिंकलेली ही सर्वाधिक पदकं आहेत. यापूर्वी टोकियो पॅरालिम्पिकमध्ये भारताने १९ पदके जिंकले होती. भारताच्या या २९ पदकांमध्ये ७ सुवर्ण, ९ रौप्य व १३ कांस्य पदकांचा समावेश आहे. या २९ पदकांसह भारत पदकतालिकेत १८ व्या क्रमांकावर आहे. चीन (२२० पदके) पहिल्या, ग्रेट ब्रिटन (१२४ पदके) दुसऱ्या आणि अमेरिका (१०५ पदके) तिसऱ्या क्रमांकावर आहे.

पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत अवनी लेखरा (नेमबाजी) आणि सुमित अंतील (भालाफेक) यांसारख्या टोकियो सुवर्णपदक विजेत्यांनी आपले विजेतेपद कायम ठेवले आहे. नितेश कुमार (बॅडमिंटन), नवदीप सिंग (भालाफेक), हरविंदर सिंग (तिरंदाजी), धरमबीर नैन (क्लब थ्रो) आणि प्रवीण (उंच उडी) यांनी भारतासाठी प्रथमच पदके जिंकली आहेत. यावेळी १३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील खेळाडूंनी भारतासाठी पदके मिळवण्यात मोठे योगदान दिले आहे. यात हरयाणा आठ पदकांसह आघाडीवर आहे, तमिळनाडू चार पदकांसह दुसऱ्या स्थानावर आहे व राजस्थान आणि उत्तर प्रदेश हे तीन पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहेत. हरयाणाने सातपैकी चार सुवर्णपदके जिंकून सर्वाधिक योगदान दिले आहे.

हरियाणा (८ पदकं): मनीष नरवाल, नितेश कुमार, हरविंदर सिंग, सुमित अंतील, धरमबीर नैन, नवदीप सिंग, योगेश कथुनिया, प्रणव सूरमा. तामिळनाडू (४ पदकं): नित्या श्री सिवान, तुलसीमाथी मुरुगेसन, मनीषा राम दास, मरियप्पन थांगावेलू. राजस्थान (३ पदकं): अवनी लेखरा, मोना अग्रवाल, सुंदर सिंग गुरजर. उत्तर प्रदेश (३ पदकं): सिमरन शर्मा, प्रीती पाल, अजित सिंग. जम्मू आणि काश्मीर (३ पदकं): शीतल देवी, राकेश कुमार. मध्य प्रदेश (२ पदकं ): रुबिना फ्रान्सिस, कपिल परमार. महाराष्ट्र : सचिन खिलारी, हिमाचल प्रदेश: निषाद कुमार, दिल्ली : प्रवीण कुमार, कर्नाटक : सुहास यथीराज, बिहार : शरद कुमार, नागालँड: होकातो सेमा, तेलंगणा: दीप्ती जीवनजी.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)